cmyk

## संपादकीय

### ‘नारी शक्ती’ की ‘मतशक्ती’?

भारताच्या लोकशाहीत आज सर्वात प्रभावशाली मतदारवर्ग कोणता असेल, तर तो महिलांचा आहे. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत सुमारे ३१.२ कोटी महिलांनी मतदान केले, ही देशाच्या निवडणूक इतिहासातील विक्रमी नोंद आहे. महिलांचे वाढते मतदान हे भारतीय लोकशाहीचे सकारात्मक चित्र आहे. मात्र याच वास्तवातून एक कठोर प्रश्न उभा राहतोसरकारे महिलांना खऱ्या अर्थाने निर्णय प्रक्रियेत सहभागी करत आहेत की त्यांच्या मतांना राजकीय गणिताचा केंद्रबिंदू बनवत आहेत.


दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

• छत्रपती संभाजीनगर • पुणे • अहिल्यानगर • जालना • धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–११७ | शुक्रवार दि.१७ जुलै २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये


## थोडक्यात...

### अंत्योदय रेशनकार्डधारक कुटुंबाला आता साडी नाही!

मुंबई : अंत्योदय रेशन कार्ड असणारया कुटुंबाला यापूर्वी वर्षाला एक मोफत साडी मिळत होती. पण महाराष्ट्र शासनाच्या वस्त्रोद्योग विभागाने कॅप्टिव मार्केट योजनाच बंद करण्याचा निर्णय घेतला. यामुळे यापुढे अंत्योदयचा लाभ घेणाऱ्यांना साडी मिळणार नाही. यापूर्वी या योजनेअंतर्गत पात्र कुटुंबातील महिलांना वर्षातून एकदा सण–उत्सव किंवा होळीच्या काळात रेशन दुकानांमधून प्रत्येकी एक साडी मोफत दिली जात होती. जाहीर झालेल्या शासन निर्णयातून वस्त्रोद्योग विभागाने ही कबूली दिली आहे. इतर प्रस्तावित योजनांचा भार असल्याने ही योजना बंद करण्याचा निर्णय घेतला असल्याचे सांगण्यात आले आहे. सन २०२३ पासून ही योजना सुरु होती. पण सध्या वस्त्रोद्योग महामंडळातर्फे सुरु असलेल्या इतर योजना, वस्त्रोद्योग घटकांना दिले जाणारे अर्थसहाय्य, व प्रस्तावित योजनांचा भार यामुळे यापूढे कॅप्टीव्ह मार्केट ही योजना बंद करावी लागत आहे. ही साडी यंत्रमागावर विणलेली असायची.

### इस्त्रोमधील १०० हून अधिक शास्त्रज्ञांचे राजीनामे

दिल्लीः भारतीय अंतराळ संशोधन संस्थेच्या देशातील विविध केंद्रांमधून जवळपास १०० शास्त्रज्ञ आणि अभियंत्यांनी राजीनामा सादर केला आहे. आता गगनयानसारख्या देशाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या आणि संवेदनशील मोहिमांवर कार्यरत असलेल्या शास्त्रज्ञ आणि अभियंत्यांची ही गळती रोखण्यासाठी अंतराळ विभागाने एक विशेष कार्यालयीन निवेदन जारी केले आहे. यामुळे भारताची महत्त्वाकांक्षी मानवी अंतराळ मोहीम गगनयान आणि इतर राष्ट्रीय महत्त्वाच्या प्रकल्पांना मोठा धक्का बसण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या राजीनामा लाटेमुळे निर्माण झालेली तज्ज्ञांची कमतरता लक्षात घेता, अंतराळ विभागाने एक अत्यंत महत्त्वाचा आणि कडक निर्णय घेतला आहे. आता महत्त्वाच्या मोहिमांवर काम करणाऱ्या वर्ग अ च्या शास्त्रज्ञांचे राजीनामे किंवा स्वेच्छानिवृत्ती थेट मंजूर न करता, त्यासाठीचे नियम कमालीचे कडक करण्यात आले आहेत.

### श्रीकृष्ण नमाज अदा करत होते–मौलाना अन्सारी

दिल्लीः मौलाना जर्जिस अन्सारी यांच्या एका वक्तव्यामुळे नव्या वादाला तोंड फुटले आहे. झारखंडमधील एका धार्मिक कार्यक्रमात बोलताना त्यांनी भगवान श्रीकृष्ण हे मुस्लिम होते आणि ते दिवसातून पाच वेळा नमाज अदा करत असत, असा दावा केला. त्यांचा हा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर संत समाज, हिंदू संघटना आणि विविध राजकीय पक्षांकडून तीव्र प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत. व्हिडिओमध्ये मौलाना जर्जिस अन्सारी यांनी श्रीमद्भगवद्गीतेच्या सहाव्या अध्यायातील दहाव्या श्लोकाचा संदर्भ देत, त्यामध्ये वर्णन केलेली ध्यान–साधना ही प्रत्यक्षात नमाजच असल्याचा दावा केला. त्यांनी केवळ भगवान श्रीकृष्णच नव्हे, तर भगवान श्रीराम यांनीही इस्लामच्या शिकवणीचे पालन केल्याचा दावा केला. या वक्तव्यानंतर संत समाजाने तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. अनेक संतांनी हे विधान सनातन धर्माच्या श्रद्धांचा अपमान करणारे असल्याचे म्हटले आहे. धार्मिक भावना दुखावण्याचा आणि समाजात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१६ जुलै २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|
| गहू: ७४.०० क्विंटल | | |
| २,५७० | २,८०० | २,६६० |
| ज्वारी/हायब्रिड: ७६.५० क्विंटल | | |
| २,५९० | ४,३०० | ३,१३९ |
| मका/लोकल: ३९.५० क्विंटल | | |
| २,००० | २,२४९ | २,१२४ |
| तूर : ३.०० क्विंटल | | |
| ६,८०० | ६,८०० | ६,८०० |
| उडीद : २.०० क्विंटल | | |
| ५,००० | ५,००० | ५,००० |
| बाजरी: १२९.५० क्विंटल | | |
| २,२३१ | ३,१०० | ३,१०० |
| मुग: १.०० क्विंटल | | |
| ७,०६० | ७,०६० | ७,०६० |
| सोयाबीन:१.५० क्विंटल | | |
| ६,६०० | ६,६०० | ६,६०० |
| हरभरा: ६.५० क्विंटल | | |
| ४,७०१ | ५,७०२ | ५,०५१ |

## उच्च दर्जाच्या बियाण्यांसाठी राज्याचे सर्वसमावेशक धोरण

# निकृष्ट बियाण्यांवर लगाम घालणार–दत्तात्रय भरणे

मुंबई । प्रतिनिधी

**राज्यातील शेतकऱ्यांना उच्च दर्जाचे बियाणे उपलब्ध करून देणे, निकृष्ट व बनावट बियाण्यांमुळे होणारे नुकसान टाळणे तसेच बियाणे उत्पादन, साठवणूक, तपासणी आणि विक्री प्रक्रियेत अधिक पारदर्शकता आणण्यासाठी राज्य शासन लवकरच सर्वसमावेशक बियाणे धोरण तयार करणार असल्याची माहिती कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली. मंत्रालयात बियाणे तपासणीच्या उत्तरदायित्वाच्या कार्यपद्धतीत (एसओपी) सुधारणा करून नवीन मानक कार्यपद्धती निश्चित करण्यासाठी आयोजित बैठकीत ते बोलत होते.**




कृषिमंत्री भरणे म्हणाले की, बियाण्यांच्या गुणवत्तेबाबत स्पष्ट उत्तरदायित्व निश्चित करून शेतकऱ्यांचा विश्वास अधि३क दृढ करणे आणि बियाणे व्यवस्थेतील प्रत्येक टप्पा सक्षम करणे हे शासनाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. यासाठी सर्व संबंधित घटकांच्या सूचना आणि शिफारशींचा विचार करून अंतिम धोरण तयार करण्यात येणार आहे. नव्या धोरणात साथी पोर्टलचा प्रभावी वापर, क्यूआर कोडद्वारे बियाण्यांचा मागोवा, स्रोत बियाण्याची पडताळणी, खासगी प्रक्रिया केंद्रांची नोंदणी, सरकारी प्रयोगशाळांमध्ये नमुने सादर करणे, नमुन्यांची जलद तपासणी, ई–लॅब आणि कोड प्रणालीद्वारे पारदर्शक तपासणी, ग्रो–आऊट टेस्टसारख्या आधुनिक तंत्रांचा वापर तसेच परराज्यातून येणाऱ्या बियाण्यांची विशेष तपासणी अशा उपाययोजनांचा समावेश करण्यात येणार आहे. याशिवाय, शेतकऱ्यांच्या बियाण्यांबाबतच्या तक्रारींवर तातडीने कार्यवाही, गुणवत्ता नियंत्रण अधिक प्रभावी करणे, तपासणी प्रक्रि येत पारदर्शकता वाढविणे आणि निकृष्ट बियाण्यांमुळे होणारे नुकसान टाळण्यासाठी आवश्यक कायदेशीर व प्रशासकीय ▶▶ पान २ वर

# सरकारला देशातील आंदोलनाचा बळी घ्यायचा आहे !

## राज ठाकरे यांची खोचक टीका, वांगचुक यांच्या उपोषणाला पाठिंबा



मुंबई । प्रतिनिधी

### दिल्ली हायकोर्ट गंभीर; सरकारला तातडीचे आदेश

“ गेल्या १९ दिवसांपासून जंतर–मंतर येथे बेमुदत उपोषण करत असलेले सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांच्या प्रकृतीबाबत दिल्ली उच्च न्यायालयाने गंभीर चिंता व्यक्त केली आहे. त्यांच्या आरोग्य आणि सुरक्षेसंदर्भात दाखल करण्यात आलेल्या जनहित याचिकेवर सुनावणी करताना न्यायालयाने केंद्र सरकारला नियमित वैद्यकीय तपासणी करण्याचे निर्देश दिले आहेत. यावर उच्च न्यायालयाने स्पष्ट केले की, सरकारी डॉक्टरांकडून नियमित वैद्यकीय तपासणी केली जावी आणि डॉक्टरांच्या अहवालानुसार आवश्यक वाटल्यास तातडीने योग्य वैद्यकीय हस्तक्षेप करण्यात यावा. प्रत्येक नागरिकाचे आयुष्य अनमोल आहे आणि ते वाचवण्यासाठी शक्य ते सर्व प्रयत्न झाले पाहिजेत.

सोनम वांगचुक यांच्या उपोषणाचा हा आजचा १९ वा दिवस. त्यांच्या तब्येतीच्या ज्या बातम्या ऐकू येत आहेत किंवा जी दृश्य खासकरून सोशल मीडियावर दिसत आहेत ती निश्चितच काळजीत टाकणारी आहेत. हे म्हणायला प्रचंड वाईट वाटतेय की सरकारने सोनम वांगचुक यांचा आणि पर्यायाने या देशातील आंदोलनाची म्हणून एक जागा आहे तिचा बळीच घ्यायचा ठरवला आहे. हे सरकार जिथे श्रीरामाच्या तिजोरीला लुटले जात असताना शांतपणे बघू शकते तिथे त्यांना नागरिकांच्या आंदोलनांने काय फरक पडणार.? अशी खोचक टीका राज ठाकरे यांनी सरकारवर केली आहे.

नीट पेपरफुटी प्रकरणी आणि शिक्षण मंत्री धर्मेद्र प्रधान यांच्या राजीनामा प्रकरणी काँकरोच जनता पार्टी अर्थात सीजेपी आणि वातावरणीय कार्यकर्त्ये सोनम वांगचुक यांनी उपोषणाचे आंदोलन सुरु केले आहे. सोनम वांगचुक यांच्या उपोषणाचा गुरूवारी १९ वा दिवस आहे. या १९ दिवसात सोनम वांगचुक यांच्यासह सीजेपीच्या काही कार्यकर्त्यांनीही उपोषणाचे आंदोलन सुरु केले आहे. सोनम वांगचुक यांचे वजन ९ किलोने घटले असून उपोषणाच्या आंदोलनाचे परिणाम त्यांच्या शरीरावर दिसण्यास सुरुवात झाली आहे. मात्र या १९ केंद्र सरकार किंवा भाजपाच्या पदाधिकाऱ्यांनी सोनम वांगचुक यांच्याशी संवाद साधण्याचा प्रयत्न केला नाही. त्यामुळे परिस्थिती आणखीनच चिघळली आहे. या पार्श्वभूमीवर मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी समाज माध्यमावर आपल्या भावना व्यक्त करत चिंता व्यक्त केली. राज ठाकरे आपल्या पोस्टमध्ये म्हणाले की, ज्या संस्थांनी निष्पक्ष वागायला हवे त्यांनाच स्वतःच्या ताब्यात घेतले आहे. निवडणुका हव्या तशा मॅनेज करून घेतल्या जात आहेत. ▶▶ पान २ वर

# मतदारसंघ फेररचनेवरून राजकारण तापले

## खर्गेंचे मोदींना पत्र, सर्वपक्षीय बैठकीची मागणी





नवी दिल्ली । वृत्तसंस्था

देशातील प्रस्तावित मतदारसंघ फेररचनेच्या मुद्द्यावरून राजकीय वातावरण तापण्याची चिन्हे अधिक स्पष्ट होत आहेत. काँग्रेससह विविध विरोधी पक्षांनी या विषयावर आक्रमक भूमिका घेतली असून, काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी थेट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र लिहून या विषयावर तातडीने सर्वपक्षीय बैठक बोलावण्याची मागणी केली आहे.

खर्गे यांनी आपल्या पत्रात मतदारसंघ फेररचनेशी संबंधित सुधारित प्रस्तावांचा सखोल अभ्यास करण्यासाठी सर्व राजकीय पक्षांना पुरेसा वेळ मिळणे आवश्यक असल्याचे नमूद केले आहे. लोकशाही प्रक्रियेत इतक्या महत्त्वाच्या विषयावर व्यापक चर्चा आणि सर्व संबंधित पक्षांचा सहभाग आवश्यक ▶▶ पान २ वर

# लवासा प्रकरणात पवार कुटुंबियांना मोठा दिलासा

## याचिकेत हस्तक्षेप करण्यास सर्वोच्च न्यायालयाचा नकार



दिल्ली । वृत्तसंस्था

लवासा हिल स्टेशन प्रकल्पाबाबत माजी केंद्रीय मंत्री शरद पवार, दिवंगत माजी उपमुख्यमंत्री अजित पवार, खासदार सुप्रिया सुळे यांना सर्वोच्च न्यायालयाने मोठा दिलासा दिला आहे. या सर्वांवर गंभीर आरोप करणारी याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावली. या प्रकरणी शरद पवार, अजित पवार, सुप्रिया सुळे यांच्याविरूद्ध एफआयआर दाखल करण्यात यावी, अशी मागणी या याचिकेतून केली होती. ही मागणी सर्वोच्च न्यायालयाने अमान्य केली आहे.

सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी या याचिकेच्या सुनावणीदरम्यान हस्तक्षेप करण्यास आम्ही अजिबात इच्छुक नाही असे सांगत सर्वोच्च न्यायालयाने याचिकाकर्त्यांच्या ▶▶ पान २ वर

# इथेनॉलमिश्रित पेट्रोलमुळे वाहनांचा मालयेज कमी

## आदित्य ठाकरेंचे पंतप्रधान नरेंद्र मोदींना पत्र, लाखो भारतीयांवर परिणाम झाल्याचा दावा




मुंबई । प्रतिनिधी

सोशल मीडियावर गेल्या काही दिवसांत इथेनॉलमिश्रित पेट्रोलमुळे वाहनांचा मायलेज कमी झाल्याच्या तक्रारी सातत्याने पाहायला मिळत आहेत. अनेक युट्यूबर्सनें याबाबत व्हिडिओ बनवून आपली भूमिका मांडली आहे, तर काही मिम्सही व्हायरल झाले आहेत. केंद्रीय दळणवळणमंत्री नितीन गडकरींना मेन्शन करत नेटीझन्स आपला अनुभव सांगत आहेत. मात्र, काहीजण मला जाणीवपूर्वक टार्गेट करत असून माझ्याविरुद्ध पेड कॅम्पेन राबवले जात असल्याचे नितीन गडकरींनी म्हटले होते. आता, ठाकरेंच्या शिवसेना पक्षाचे नेते तथा आमदार आदित्य ठाकरेंनीही इथेनॉलमिश्रित पेट्रोलमुळे वाहनांचा मायलेज कमी झाल्याचे सांगत थेट पंतप्रधान नरेंद मोदींना पत्र लिहिले आहे. तसेच, ग्राहकांना १०० टक्के पेट्रोल आणि इथेनॉलमिश्रित पेट्रोल असा पर्याय उपलब्ध करून देण्याची मागणी देखील त्यांनी केली आहे.

आदित्य ठाकरेंनी पंतप्रधान नरेंद्र मोदींना पत्र लिहून इथेनॉलमिश्रित पेट्रोलमुळे लाखो भारतीयांवर परिणाम झाल्याचे म्हटले. केंद्र सरकारकडून इथेनॉल–मिश्रित इंधनाचा वापर अनिवार्य करण्याच्या मुद्द्यावर हे पत्र लिहिण्यात आले आहे. या निर्णयामुळे लाखो भारतीय वाहनधारकांवर परिणाम झाला असून, त्याचा व्यापक अर्थव्यवस्थेवरही परिणाम दिसून येत आहे, असे त्यांनी आपल्या पत्रात म्हटले आहे. तसेच, एखाद्या विशिष्ट हितसंबंधी गटाला लाभ मिळवून देण्यासाठी केंद्र सरकारने भारतीय नागरिकांवर हा निर्णय लादणे, असे या इथेनॉलच्या मुद्द्याचे स्वरूप बनू नये. त्याऐवजी नागरिकांना परवडणाऱ्या दरात पर्याय ▶▶ पान २ वर

# ‘सुनेत्रा पवारांना अडचणीत आणण्याचा प्रयत्न’

## पक्षात सर्वकाही अलबेल नसल्याचा दावा करीत मिटकरींचा खळबळजनक आरोप

पुणे । प्रतिनिधी


पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे आणि कार्यकारी अध्यक्ष प्रफुल पटेल यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची भेट घेऊन चर्चा केली. मात्र, या भेटीबाबत सुनेत्रा पवार यांना काहीच माहिती नसल्याचे समोर आले आहे. त्यावरुन, माजी आमदार अमोल मिटकरी यांनी राष्ट्रवादीत काहीही आलबेल नसल्याचे



मान्य केले आहे. राष्ट्रवादीचे नेते तथा मंत्री दत्तात्रय भरणे यांनीच याला दुजोरा दिला आहे. भरणे यांच्या वक्तव्यानंतर मिटकरी यांनी ही बाब अत्यंत गंभीर असल्याचे म्हटले आहे.

दिवंगत अजित पवार यांच्या राष्ट्रवादीत काही आलबेल नसल्याची चर्चा आहे. दोन दिवसांपूर्वी पक्षाचे वरिष्ठ नेते सच्चिदानंद सिंह यांनी सुनेत्रा पवार यांच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी निवडीला आक्षेप घेत कायदेशीर नोटीस बजावली होती. ▶▶ पान २ वर

# जगन्नाथ पुरीच्या रथयात्रेत चेंगराचेंगरी दोघांचा मृत्यू, अनेक भाविक जखमी



पुरी । वृत्तसंस्था

ओडिशातील पुरी येथे आयोजित जगन्नाथ रथयात्रेत अचानक प्रचंड गर्दी वाढल्यामुळे चेंगराचेंगरीची घटना घडली आहे. या दुर्घटनेत दोघांचा मृत्यू झाला असून, शंभरहून अधिक भाविक जखमी झाले आहेत. गर्दीत गुदमरल्यामुळे एका महिला भाविकाचा मृत्यू झाला, तर दुसऱ्या एका घटनेत ▶▶ पान २ वर

# कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात पावसाचा येलो अलर्ट; विदर्भात उघडीप राहणार

पुणे । प्रतिनिधी

**राज्यात पावसाला पोषक झाल्याने काही भागात पावसाच्या हलक्या सरी हजेरी लावत आहेत. तर काही भागांत कमाल तापमानाचा पारा ३७ च्या पार पोहचल्याने उन्हाचा चटका वाढला आहे. त्यामुळे घामाच्या धारा वाहू लागल्या आहेत. तसेच ऊन–सावल्यांचा खेळही अनुभवायला मिळत आहे. दरम्यान, कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील काही जिल्ह्यांत तुरळक ठिकाणी विजांसह वादळी पावसाची इशारा देण्यात आला आहे. तर राज्याच्या उर्वरित भागांत मात्र ऊन सावल्यांच्या खेळ सुरु राहून उन्हाचा चटका कायम राहण्याचा अंदाज हवामानशास्त्र विभागाने दिला आहे.**



गुरुवारी सातारा घाटमाथा, सातारा, सोलापूर आणि धाराशिव जिल्ह्यांत विजांसह वादळी पावसाचा येलो अलर्ट देण्यात आला आहे. तसेच नांदेड, परभणी, हिंगोली, बीड, लातूर, अहिल्यानगर, सांगली, नाशिक, नाशिक घाटमाथा, पुणे घाटमाथा, ठाणे, मुंबई, रायगड, रत्नागिरी, पुणे जिल्ह्यांत तुरळक ठिकाणी विजांसह हलक्या सरी हजेरी लावण्याचा अंदाज आहे. तर राज्याच्या उर्वरित भागात मात्र उघडीप राहण्याचा अंदाज हवामानशास्त्र विभागाने दिला आहे. समुद्रसपाटीवरील मॉन्सूनचा आस असलेल्या कमी दाबाच्या पट्ट्याचा पश्चिमेकडील भाग नेहमीच्या स्थितीच्या उत्तरेला असून, पूर्वेकडील भाग सामान्य स्थितीजवळ ▶▶ पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# ‘नारी शक्ती’ की ‘मतशक्ती’? सन्मान की मतांचं राजकारण?

भारताच्या लोकशाहीत आज सर्वात प्रभावशाली मतदारवर्ग कोणता असेल, तर तो महिलांचा आहे. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत सुमारे ३१.२ कोटी महिलांनी मतदान केले, ही देशाच्या निवडणूक इतिहासातील विक्रमी नोंद आहे. महिलांचे वाढते मतदान हे भारतीय लोकशाहीचे सकारात्मक चित्र आहे. मात्र याच वास्तवातून एक कठोर प्रश्न उभा राहतोसरकारे महिलांना खऱ्या अर्थाने निर्णय प्रक्रियेत सहभागी करत आहेत की त्यांच्या मतांना राजकीय गणिताचा केंद्रबिंदू बनवत आहेत.?

सप्टेंबर २०२३ मध्ये संसदेने ‘नारी शक्ती वंदन अधिनियम’ मंजूर केले. या कायद्यात लोकसभा आणि विधानसभांमध्ये ३३ टक्के महिला आरक्षणाची तरतूद आहे. हे निश्चितच ऐतिहासिक पाऊल मानले गेले. पण या कायद्याचा सर्वात मोठा वाद त्याच्या अंमलबजावणीवर आहे. कारण हे आरक्षण जनगणना आणि त्यानंतरच्या मतदारसंघ पुनर्रचनेशी जोडण्यात आले आहे. म्हणजे कायदा मंजूर झाला, पण महिलांना प्रत्यक्ष जागा कधी मिळतील, याची निश्चित तारीख आजही नाही. सरकारचे म्हणणे आहे की ही घटनात्मक प्रक्रिया आहे आणि ती पूर्ण झाल्यानंतरच आरक्षण लागू होऊ शकते. दुसरीकडे विरोधक आणि अनेक महिला संघटना असा आरोप करतात की अंमलबजावणी पुढे ढकलल्यामुळे या निर्णयाचा राजकीय फायदा आधी घेतला गेला, पण महिलांना तातडीचे प्रतिनिधित्व मिळाले नाही. हा आरोप आहे; ते सिद्ध झालेले तथ्य नाही. पण प्रश्न विचारणे हे लोकशाहीचे कर्तव्य आहे. जर महिलांच्या सक्षमीकरणाबाबत सरकार इतके गंभीर होते, तर हा कायदा मंजूर झाल्यानंतर तातडीने अंमलबजावणी होईल, अशी यंत्रणा का तयार करण्यात आली नाही? घोषणेला टाळ्या मिळाल्या, पण महिलांना जागा मिळाल्या का.? याच काळात केंद्र आणि अनेक राज्य सरकारांनी महिलांसाठी विविध योजना जाहीर केल्या. थेट आर्थिक मदत, मोफत प्रवास, गॅस अनुदान, ‘लाडकी बहीण’सारख्या योजना, शिष्यवृत्ती आणि इतर लाभ योजनांचा विस्तार करण्यात आला. या योजनांमुळे लाखो महिलांना आर्थिक आधार मिळाल्याचे वास्तव नाकारता येत नाही. अनेक गरीब कुटुंबांसाठी ही मदत महत्त्वाची ठरली आहे. पण दुसरा प्रश्न अधिक महत्त्वाचा आहे. महिलांना दरमहा काही हजार रुपयांची मदत देणे म्हणजे सक्षमीकरण की निर्णयक्षमतेची संधी देणे हे खरे सक्षमीकरण? आर्थिक मदत आवश्यक असते; पण ती महिलांना राजकीय, सामाजिक आणि आर्थिक स्वायत्तता देते का.? महिलांना समान वेतन, सुरक्षित कार्यस्थळ, गुणवत्तापूर्ण शिक्षण, आरोग्यसेवा, उद्योगासाठी कर्ज, नेतृत्वाच्या संधी आणि निर्णय प्रक्रियेत समान सहभाग मिळत नसेल, तर केवळ कल्याणकारी योजनांमुळे सक्षमीकरण पूर्ण होईल का? आज प्रत्येक निवडणुकीत महिला मतदार निर्णायक ठरत आहेत. अनेक राज्यांत महिलांचे मतदान पुरुषांपेक्षा जास्त झाले आहे. त्यामुळे सर्वच राजकीय पक्ष महिलांसाठी स्वतंत्र घोषणा करतात. हा लोकशाहीचा भाग आहे. परंतु महिलांकडे मतदार म्हणून पाहिले जाते की धोरणनिर्माती म्हणून? हा प्रश्न अधिक गंभीर आहे. इतिहास पाहिला तर महिलांच्या नावाने अनेक घोषणा झाल्या; पण संसद, विधानसभांमधील त्यांचे प्रतिनिधित्व अजूनही लोकसंख्येच्या प्रमाणात नाही. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आरक्षणामुळे हजारो महिला नेतृत्वात आल्या, हे यशस्वी उदाहरण आहे. मग राज्य आणि राष्ट्रीय पातळीवरही तोच वेग का दिसत नाही? सरकार कोणतेही असो केंद्रातील किंवा राज्यातील महिलांच्या सन्मानाचा खरा कस घोषणांमध्ये नाही, तर निर्णय प्रक्रियेत त्यांच्या समान सहभागात असतो. महिलांच्या सन्मानाची भाषा निवडणुकांच्या काळात सर्वाधिक ऐकू येते. पण निवडणुका संपल्यानंतर महिलांच्या सुरक्षेचे प्रश्न, रोजगारातील असमानता, वेतनातील तफावत, राजकीय प्रतिनिधित्व आणि न्यायव्यवस्थेतील विलंब यावर तेवढ्याच ताकदीने काम होते का? हा प्रश्न केवळ एका सरकारला नाही, तर गेल्या अनेक दशकांतील सर्व सरकारांना लागू होतो. ‘नारी शक्ती’ हा शब्द प्रभावी आहे. पण त्या शक्तीला सत्ता, निर्णयक्षमता आणि समान संधी मिळत नसतील, तर तो शब्द घोषणांपुरताच मर्यादित राहण्याचा धोका आहे. महिलांचा सन्मान म्हणजे केवळ योजना जाहीर करणे नव्हे. त्यांना संसदेत आवाज देणे, विधानसभेत नेतृत्व देणे, प्रशासनात समान संधी देणे, सुरक्षित समाज निर्माण करणे आणि आर्थिक स्वावलंबनासाठी कायमस्वरूपी व्यवस्था उभी करणे, हेच खरे सक्षमीकरण आहे. लोकशाहीत महिलांना ‘व्होट बँक’ म्हणून नव्हे, तर ‘पॉवर सेंटर’ म्हणून स्वीकारण्याची वेळ आता आली आहे. कारण भारताच्या अर्ध्या लोकसंख्येला फक्त मतदानाचा अधिकार नव्हे, तर समान नेतृत्वाचा अधिकारही आहे. आणि जोपर्यंत हा अधिकार प्रत्यक्षात दिसत नाही, तोपर्यंत कोणत्याही सरकारला हा प्रश्न विचारला जात राहीलमहिलांचा खरोखर सन्मान केला जातोय, की त्यांच्या मतांचा?

# साप्ताहिक वृत्तपत्राचा संपादक व भावी वकील अटकेत!

## खंडणी व सोन्याच्या अंगठ्या घेतली प्रकरणी; ३ लाखाचा मुद्देमाल जप्त

जालना | प्रतिनिधी

**अश्लील फोटो काढून, सोशल मीडियावर व्हायरल करण्याची व बदनामी करण्याची धमकी देत पैसे आणि सोन्याचे दागिने उकळणाऱ्या एका हायप्रोफाइल ब्लॅकमेलर टोळीचा चंदनझिरा पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. या खळबळजनक प्रकरणात स्वत:ला 'रिलस्टार' म्हणवून घेणारी महिला, एका वृत्तपत्राचा संपादक आणि वकिलीचे शिक्षण घेणाऱ्या तरुणासह तिघांना अटक करण्यात आली आहे. न्यायालयाने तिन्ही आरोपींना १७ जुलैपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.**

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, जालना शहरातील नवीन मोंढा परिसरातील एका ४५ वर्षीय व्यक्तीची मुख्य महिला आरोपीशी नुकतीच ओळख झाली होती. २ जून २०२६ रोजी घर दाखविण्याच्या बहाण्याने महिलेने या व्यक्तीला आपल्या घरी बोलावून घेतले. तिथे ती आधीच दबा धरून बसलेल्या तिच्या तीन साथीदारांच्या मदतीने तक्रारदाराला बेदम मारहाण केली. त्यानंतर त्यांचे अश्लील फोटो काढून ते सोशल मीडियावर व्हायरल करण्याची भीती दाखवत खंडणी मागण्यास सुरुवात केली. बदनामीच्या धाकाने आरोपींनी तक्रारदाराकडून ७५ हजार रुपये रोख आणि अंदाजे दोन तोळे वजनाच्या तीन सोन्याच्या अंगठ्या खंडणी स्वरूपात जबरदस्तीने उकळल्या. एवढ्यावरच न थांबता आरोपींनी तक्रारदाराच्या वाहनाचेही मोठे नुकसान केले होते. या गंभीर गुन्ह्याची माहिती मिळताच पोलीस अधीक्षक तेगबीरसिंह संधू आणि अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी यांच्या मार्गदर्शनाखाली चंदनझिरा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक बाळासाहेब पवार यांनी तातडीने तपासाची सूत्रे हाती घेतली. 'पोलीस उपनिरीक्षक नीता दामधर यांच्या नेतृत्वाखालील विशेष पथकाने तांत्रिक विश्लेषण आणि गोपनीय माहितीच्या आधारे १४ जुलै रोजी मुख्य महिला आरोपी शुभांगी हिवाळे हिला मंठा रोड परिसरातून ताब्यात घेतले. तिच्या सखोल चौकशीतून मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी राम राजू पाटोळे (आर.आर.) आणि अनिकेत प्रशांत कसबे या दोघांना शिताफीने अटक केली. तपासात राम पाटोळे हा एका वृत्तपत्राचा संपादक असून, अनिकेत कसबे हा वकिलीचे शिक्षण घेत असल्याचे निष्पन्न झाले आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपींकडून तक्रारदाराच्या दोन सोन्याच्या अंगठ्या, गुन्ह्यात वापरलेले मोबाईल फोन, दोन दुचाकी आणि रोख रक्कम असा एकूण ३ लाख १४ हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे. हा प्रकार २ जून रोजी घडला होता, मात्र समाजात बदनामी होईल या भीतीने तक्रारदार सुरुवातीला पोलीस ठाण्यात गेले नव्हते. काही दिवसांपूर्वीच अशाच प्रकारच्या गुन्ह्यात सपना निकाळजे व तिच्या टोळीला चंदनझिरा पोलिसांनी अटक केली होती. त्यानंतर पोलिसांनी अशा प्रकारच्या गुन्ह्यांना बळी पडलेल्या नागरिकांना न भीता पुढे येण्याचे आवाहन केले होते. या आवाहनाला प्रतिसाद देत तक्रारदाराने पोलीस ठाणे गाठले. पोलीस निरीक्षक बाळासाहेब पवार यांनी त्यांना धीर देऊन कायदेशीर मार्गदर्शन केल्याने त्यांनी अखेर तक्रार दाखल केली, ज्यामुळे या मोठ्या रॅकेटचा पर्दाफाश झाला. सदर यशस्वी कारवाई पोलीस अधीक्षक तेगबीरसिंह संधू, अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी, उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक बाळासाहेब पवार, पोउपनि नीता दामधर, पोहेकॉ कृष्णा तंगे, राजू पवार, अभिजीत वायकोस, नवनाथ पाटील, सागर खैरे, महिला पोलीस ज्योती राजपूत व स्थानिक गुन्हे शाखेचे पोहेकॉ सागर बावस्कर यांनी केली आहे.

## पान १ वरून...

### निकृष्ट बियाण्यांवर लगाम

उपाययोजनांचाही नव्या धोरणात समावेश केला जाणार असल्याचे भरणे यांनी स्पष्ट केले. शेतकरी हिताला सर्वोच्च प्राधान्य देत समिती सदस्यांनी मांडलेल्या सूचना आणि अभिप्रायांचा सखोल अभ्यास करून अंतिम धोरण निश्चित करण्यात येईल, असेही कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी सांगितले.

----------

### मतदारसंघ फेररचनेवरून

असल्याचे त्यांनी अधोरेखित केले आहे. खर्गे यांनी पत्रात म्हटले आहे की, मार्च आणि एप्रिल महिन्यात त्यांनी संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजीजू यांनाही सर्वपक्षीय बैठक बोलावण्याची विनंती केली होती. मात्र, त्या मागणीला सरकारकडून कोणताही सकारात्मक प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे आता थेट पंतप्रधानांनी या विषयात हस्तक्षेप करून सर्वपक्षीय चर्चा घडवून आणावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. खर्गे यांनी १३१ व्या घटनादुरुस्तीशी संबंधित विधेयकाचाही उल्लेख केला आहे. हे विधेयक लोकसभेत आवश्यक असलेले दोन-तृतीयांश बहुमत मिळवू शकले नव्हते. आता सरकार सुधारित स्वरूपात नवीन विधेयक आणण्याच्या तयारीत असल्याची माहिती माध्यमांतून समोर येत असल्याने, त्याआधी सर्व राजकीय पक्षांशी चर्चा करणे अत्यावश्यक असल्याचे त्यांनी पत्रात नमूद केले आहे. काँग्रेसचा दावा आहे की, मतदारसंघ फेररचना हा केवळ प्रशासकीय विषय नसून देशाच्या संघराज्यीय रचनेवर, राज्यांच्या प्रतिनिधित्वावर आणि लोकशाही व्यवस्थेवर दूरगामी परिणाम करणारा मुद्दा आहे. त्यामुळे कोणताही अंतिम निर्णय घेण्यापूर्वी सर्व राज्ये आणि सर्व पक्षांचा विश्वास संपादन करणे आवश्यक आहे. दरम्यान, दक्षिण भारतातील अनेक राज्यांनीही प्रस्तावित फेररचनेबाबत चिंता व्यक्त केली आहे. लोकसंख्या नियंत्रणात यशस्वी ठरलेल्या राज्यांच्या लोकसभा जागा कमी होण्याची शक्यता असल्याचा दावा या राज्यांकडून करण्यात येत आहे. त्यामुळे या विषयावर राष्ट्रीय स्तरावर व्यापक चर्चा करण्याची मागणी अधिक तीव्र होत आहे. केंद्र सरकारकडून अद्याप खर्गे यांच्या पत्रावर अधिकृत प्रतिक्रिया आलेली नसली, तरी मतदारसंघ फेररचनेच्या मुद्द्यावरून आगामी संसदीय अधिवेशनात सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये जोरदार संघर्ष होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे या विषयाकडे देशातील राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

--------------

### सरकारला देशातील आंदोलनाचा

त्यासाठी अतिप्रचंड पैसा खर्च केला जात आहे. तो कुठून आला असा प्रश्न बहुसंख्य माध्यमं विचारत नाहीत. उलट हीच बहुसंख्य माध्यमं त्यांच्या अदृश्य बॉसच्या सांगण्यावरून सत्ताधाऱ्यांच्या पक्षातील स्वकीयांची आणि विरोधकांना कसे बदनाम करता येईल यांत व्यस्त आहेत. आणि जी माध्यमं बोलत आहेत त्यांना आणि त्यांच्या मालकांच्या डोक्यावर एक टांगती तलवार फिरत आहे. त्यामुळे एका चांगल्या मुद्द्यासाठी उभ्या केलेल्या आंदोलनाला चिरडणं, आंदोलनकर्त्यांच्या शरीराचे हाल करणं हे सरकारला सहज सोपं आहे. सोनम वांगचुक यांच्याबद्दल एकेकाळी भारतीय जनता पक्षाला आस्था होती. अर्थात भारतीय जनता पक्षाचं एक बरं असतं की त्यांच्या सोयीचा असेपर्यंत त्यांना तो माणूस प्रिय असतो असा उपरोधिक टोलाही यावेळी लगावला. निवडणुकांत अनेक उद्योग करून ओढून आणलेलं यश हे लोकांच्या मूकसंमतीचं द्योतक म्हणून दाखवायचं आणि आम्हाला कोणी प्रश्न विचारायचे नाहीत हा एक वेगळाच माज सध्या भाजपला आला असल्याची टीका केली. शेवटी आपल्या पोस्टमध्ये राज ठाकरे म्हणाले की. सोनम वांगचुक यांच्या मागण्यांबद्दल आमचा पक्ष उभा राहिला आहे आणि यापुढे राहील. पण एकूण संपूर्ण समाजाने पुढे यायला हवे असे आवाहनही राज यांनी केली आहे.

----------

### इथेनॉलमिश्रित पेट्रोलमुळे वाहनांचा

उपलब्ध करून दिला जावा, अशी मागणी देखील या पत्रातून आदित्य ठाकरे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे केली आहे. आदित्य ठाकरे पत्रात म्हणतात, पेट्रोलमध्ये इथेनॉलचे वाढते मिश्रण याबाबत देशभरातील लाखो वाहनधारक, विशेषतः युवक आणि मध्यमवर्गीय नागरिक, व्यक्त करत असलेल्या वाढत्या चिंतेकडे आपले लक्ष वेधण्यासाठी मी हे पत्र लिहित आहे. देशातील बहुतांश कुटुंबांसाठी दुचाकी किंवा चारचाकी वाहन खरेदी करणे ही ऐशोआरामाची गोष्ट नसते. अनेक वर्षांच्या कष्टातून, बचतीतून आणि अनेकदा दीर्घकालीन कर्ज फेडत हे वाहन घेतले जाते. त्यामुळे वाहन उत्पादकांनी दिलेल्या आश्वासनांनुसार ते वाहन अपेक्षित कामगिरी आणि इंधन कार्यक्षमता (मायलेज) देईल, अशी ग्राहकांची अपेक्षा असते. परंतु, इथेनॉलचे प्रमाण वाढल्यापासून अनेक नागरिकांचा दावा आहे की त्यांच्या वाहनांचे मायलेज कमी झाले असून वाहनाची कामगिरीही घसरली आहे. सध्या रस्त्यावर धावणाऱ्या अनेक वाहनांची रचना जास्त प्रमाणातील इथेनॉल मिश्रित इंधनासाठी मूळतः करण्यात आलेली नाही. त्यामुळे कोणताही पर्याय उपलब्ध नसताना या धोरणाचे परिणाम वाहनधारकांवर लादले जात असल्याची भावना निर्माण झाली आहे. इथेनॉल निर्मितीसाठी मोठ्या प्रमाणावर ऊस लागवड वाढवली जात असल्याबाबतही आदित्य यांनी चिंता व्यक्त केली जात आहे. ऊस हे देशातील सर्वाधिक पाणी लागणाऱ्या पिकांपैकी एक आहे. भारतातील अनेक भाग गंभीर पाणीटंचाईचा सामना करत असताना, हा मार्ग खरोखरच शाश्वत आहे का, असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत. तसेच, या धोरणाचा फायदा सर्वसामान्य नागरिकांपेक्षा काही विशिष्ट कंपन्या आणि औद्योगिक गटांना अधिक होत असल्याची व्यापक धारणा निर्माण झाली आहे. ही धारणा खरी असो वा नसो, या शंकांचे आणि चिंतेचे पारदर्शकपणे निरसन होणे अत्यंत आवश्यक आहे. देशातील कष्टकरी मध्यमवर्ग, युवक आणि लाखो वाहनधारकांच्या हिताचा विचार करून आपण या विनंतीचा सकारात्मक विचार कराल, असेही आदित्य यांनी म्हटले आहे.

----------

### लवासा प्रकरणात पवार

हेतूवरच संशय व्यक्त करत ही याचिका फेटाळली आहे. लवासा प्रकरणातील याचिकाकर्ते नानासाहेब जाधव यांनी या प्रकरणी पुढारी न्यूजशी एक्सक्लुझिव्ह प्रतिक्रिया दिली आहे. सर्वोच्च न्यायालयाने आमची याचिका फेटाळल्यानंतर आम्हाला मोठा धक्का बसला. उच्च न्यायालयाने माझ्या भूमिकेचं कौतुक केलं होतं. मात्र सर्वोच्च न्यायालय असं का करत नाहीये. सर्वोच्च न्यायालयाच्या विरोधात या निर्णयाविरूद्ध मोठ्या खंडपीठाकडे दाद मागण्याबाबत आम्ही कायदेशील सल्ला घेत आहोत, असे याचिकाकर्ते जाधव यांनी म्हटले आहे. जाधव पुढे म्हणाले, सर्वोच्च न्यायालयने दिलेला निकाल हा चुकीचा असून माझ्याकडे सबळ पुरावे होते. १४ वर्षांचा संघर्ष करून आता ही याचिका फेटाळल्याने खूप वाईट वाटले. चौदा वर्षात पवार कुटुंबीयांनी कधीही त्रास दिला नाही. माझ्या मनात कधी भीती नव्हती, असे ते म्हणाले.

-------------

### जगन्नाथ पुरीच्या रथयात्रेत

एका ३५ वर्षीय तरुण भाविकाचा हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने मृत्यू झाला. बेशुद्ध पडलेल्या भाविकांना तातडीने पुरी येथील जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. मृत तरुणाची ओळख अनिल दास अशी झाली आहे. माहितीनुसार, रथयात्रा पाहण्यासाठी ग्रँड रोडवर अलोट गर्दी जमली होती. एका चौकातील पोलिस बंदोबस्तापासून काही अंतरावरच गर्दीचा दाब वाढल्याने अनिल दास यांना श्वास घेण्यास त्रास झाला आणि ते खाली कोसळले, रुग्णालयात नेण्यापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला. मात्र, प्रशासनाने अधिकृत चेंगराचेंगरी झाल्याचा दावा फेटाळला असून, केवळ प्रचंड गर्दीमुळे गुदमरून महिलेचा मृत्यू झाल्याचे म्हटले आहे. भगवान जगन्नाथ, भगवान बलभद्र आणि देवी सुभद्रा यांच्या रथयात्रेदरम्यान ही दुर्दैवी घटना घडली. या उत्सवासाठी प्रशासनाकडून सुरक्षेचे चोख नियोजन करण्यात आले होते. ओडिशाचे डीजीपी वाय. बी. खुरानिया यांनी दिलेल्या माहितीनुसार, पुरीमध्ये विविध स्तरांवर सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली असून १९ आयपीएस अधिकाऱ्यांसह सुमारे १३,००० पोलिस कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

------------

### ‘सुनेत्रा पवारांना अडचणीत

त्यानंतर, तटकरे आणि पटेल यांनी थेट मुख्यमंत्र्यांची भेट घेतली. पक्ष नेतृत्वाला न विचारता नेमके कोणती चर्चा करण्यात आली? असा प्रश्न मिटकरी यांनी उपस्थित केला. पक्षातील काही नेते जाणीवपूर्वक सुनेत्रा पवार आणि पार्थ पवारांना अडचणीत आणण्याचा प्रयत्न करत असल्याचा गंभीर आरोपही त्यांनी केला. मात्र, त्यांनी कुठल्याही नेत्याचे थेट नाव घेतलेले नाही. पक्षातील याच लोकांनी सच्चिदानंद सिंह यांना ताकद दिली आहे. सुनेत्रा पवार आणि पार्थ पवारांना त्रास देणारे नेते कोण आहेत याचा शोध पक्षाचे कार्यकर्ते घेतील. पक्षाचे तळागाळातील कार्यकर्ते अशा नेत्यांना तळागाळात गाडतील. आमच्या पक्षातील कोणत्याही नेत्यांशी भेटण्यापूर्वी मुख्यमंत्र्यांनी यासंदर्भात आमच्या पक्ष नेतृत्वाशी चर्चा करावी, असे मिटकरी यांनी म्हटले आहे. तसेच, मंत्री दत्तात्रय भरणे हे आपण शेतकऱ्यांच्या मुद्द्यावर अनेकवेळा फोन केल्यानंतरही त्यांनी उत्तर दिले नाही. भरणे यांना इतर पक्षाच्या नेत्यांचे फोन उचलायला वेळ आहे. आपला फोन घेत नसून भाजप आमदारांसाठी तत्परता दाखवत असल्याचेही मिटकरी यांनी आरोप केला आहे.

-------------

### कोकण, मध्य महाराष्ट्र आणि

आहे. तसेच उत्तर पाकिस्तान आणि लगतच्या जम्मू परिसरावर खालच्या व मध्यम वातावरणीय स्तरात पश्चिमी विक्षोभामुळे चक्राकार वाऱ्यांची स्थिती सक्रिय आहे. उत्तर ओडिशा आणि पश्चिम बंगालच्या किनारपट्टीलगत वायव्य बंगालच्या उपसागरावर कमी दाबाचे क्षेत्र सक्रिय आहे. या प्रणालीसोबत समुद्रसपाटीपासून सुमारे ७.६ किलोमीटर उंचीपर्यंत चक्राकार वाऱ्यांची स्थिती असून, उंचीनुसार ती नैऋत्येकडे झुकलेली आहे. ही प्रणाली पुढील दोन दिवसांत अधिक बळकट होऊन ठळक कमी दाबाच्या क्षेत्रात रूपांतरित होण्याची शक्यता आहे. त्यानंतर ती उत्तर ओडिशा आणि गंगा खोऱ्यातील पश्चिम बंगाल ओलांडून वायव्य दिशेने सरकण्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे.

-------------

**महाराष्ट्र शासन व वनविभाग**
**तहसीलदार, मामलेदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अंबड**
**(एम.ए.जीविभाग)**

दुरध्वनी क्रमांक:०२४८३-२७५०२६ Email id-tahshildarambad@gmail.com

जा.क्र.२०२६/सेतु-कावी/-५०९ दिनांक १६/०७/२०२६

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार श्रीमान / श्रीमती **येव्हान अशोक पाटोळे रा.पाथरवाल बु. ता. अंबड जि. जालना** यांनी यांच्या स्वतःच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| | येव्हान अशोक पाटोळे | स्वतः | २७/११/२००२ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक-०५/०६/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा कार्यकारी**
**दंडाधिकारी, अंबड**

**महाराष्ट्र शासन व वनविभाग**
**तहसीलदार, मामलेदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अंबड**
**(एम.ए.जीविभाग)**

दुरध्वनी क्रमांक:०२४८३-२७५०२६ Email id-tahshildarambad@gmail.com

जा.क्र.२०२६/सेतु-कावी/-९०४ दिनांक १६/०७/२०२६

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार श्रीमान / श्रीमती **वसिम अब्दुल रज्जाक शेख, रा. शहागड ता. अंबड जि. जालना** यांनी यांच्या स्वतःच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| | वसिम ब्दुल रज्जाक शेख | स्वतः | ०३/०२/१९८६ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक-१६/०७/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा कार्यकारी**
**दंडाधिकारी, अंबड**

**महाराष्ट्र शासन व वनविभाग**
**तहसीलदार, मामलेदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अंबड**
**(एम.ए.जीविभाग)**

दुरध्वनी क्रमांक:०२४८३-२७५०२६ Email id-tahshildarambad@gmail.com

जा.क्र.२०२६/सेतु-कावी/-९०२ दिनांक १६/०७/२०२६

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार श्रीमान / श्रीमती **श्रीकृष्ण ज्ञानदेव गर्जे रा.भगवाननगर, महाकाळ ता. अंबड जि. जालना** यांनी यांच्या **मुलाच्या** जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| | वेदांत श्रीकृष्ण गर्जे | मुलगा | २५/०८/२०२३ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक-१६/०७/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा कार्यकारी**
**दंडाधिकारी, अंबड**

**महाराष्ट्र शासन व वनविभाग**
**तहसीलदार, मामलेदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अंबड**
**(एम.ए.जीविभाग)**

दुरध्वनी क्रमांक:०२४८३-२७५०२६ Email id-tahshildarambad@gmail.com

जा.क्र.२०२६/सेतु-कावी/-११९ दिनांक २७/०२/२०२६

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार श्रीमान / श्रीमती **गजानन शहादेव बडे रा.दोदडगांव ता. अंबड जि. जालना** यांनी यांच्या स्वतःच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| | जयराज गजानन बडे | मुलगा | २४/१२/२०२० |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक-२७/०२/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा कार्यकारी**
**दंडाधिकारी, अंबड**

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शुक्रवार, दि. १७ जुलै २०२६


## थोडक्यात



### श्री क्षेत्र कानिफनाथ गड पालखीचे धनगर जवळका येथे भक्तिमय वातावरणात स्वागत

पाटोदा । प्रतिनिधी

शिरूर तालुक्यातील श्री क्षेत्र कानिफनाथ गड येथील कान्होबाची वाडी येथुन पंढरपूरला जाणाऱ्या पायी पालखीचे यावर्षी धनगर जवळका येथे ग्रामस्थांनी भक्तिमय वातावरणात थाटात स्वागत केले. २२ वर्षांची परंपरा असलेली ही पालखी ह.भ.प. श्रीरंग स्वामी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूरकडे प्रस्थान करते. यावर्षी पालखीत २०० पेक्षा अधिक महिला, पुरुष आणि तरुण वारकरी सहभागी झाले आहेत.

बुधवारी सायंकाळी पालखी विघनवाडी,जिजाऊनगर,नाळवंडी ,कुटेवाडी शिखरवाडी मार्गे धनगरजवळका येथे पोहोचताच गावच्या वेशीपासून टाळ, मुंदग, भजन आणि अभंगांच्या गजरात तसेच फटाक्यांच्या आतषबाजीत पालखीचे स्वागत करण्यात आले. त्यानंतर जगदंबा मंदिरापर्यंत मिरवणूक काढण्यात आली.यावेळी सर्व वारकऱ्यांना ग्रामस्थांच्या वतीने अन्नदान करण्यात आले. रात्री श्रीरंग स्वामी महाराज यांचे कीर्तन झाले. गुरुवार सकाळी वारकऱ्यांना अल्पोहार देऊन पालखी पुढे पंढरपूरच्या दिशेने रवाना झाली. गावातील ग्रामस्थांनी पालखीला २ किलोमीटर पर्यंत निरोप दिला.

### कृषी व संलग्न महाविद्यालयांच्या प्रवेशास सुरुवात; २५ जुलैपर्यंत मुदत

बीड । प्रतिनिधी

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी आदित्य कृषी महाविद्यालय व संलग्न महाविद्यालयांच्या प्रवेश प्रक्रियेला अधिकृत सुरुवात झाली आहे. विद्यार्थ्यांनी १० ते २५ जुलै २०२६ या कालावधीत आपले प्रवेश अर्ज ऑनलाईन व ऑफलाईन पद्धतीने नोंदवावेत. असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य श्याम भुतडा यांनी केले आहे.

**पारंपरिक चौकटीबाहेर पडून विद्यार्थ्यांनी करिअरचे उज्ज्वल भविष्य घडवावे : प्राचार्य श्याम भुतडा**

आजच्या आधुनिक युगात कृषी क्षेत्र हे केवळ शेतीपुरते मर्यादित राहिलेले नाही. बदलत्या काळानुसार या क्षेत्राला देश-विदेशात मोठी मागणी निर्माण झाली असून, कुशल पदवीधरांसाठी अनेक क्षेत्रे खुली झाली आहेत. यामध्ये प्रामुख्याने विज्ञान, तंत्रज्ञान आणि संशोधन अन्न प्रक्रिया व कृषी व्यवसाय कृषी अभियांत्रिकी व जैवतंत्रज्ञान, फलोत्पादन, पशुसंवर्धन आणि ग्रामीण उद्योजकता या क्षेत्रांतील पदवीधरांना शासकीय, निमशासकीय, खासगी कंपन्यांमध्ये मोठ्या संधी उपलब्ध आहेत, तसेच स्वयंरोजगाराचे अनेक मार्ग खुले होत आहेत. विद्यार्थी व पालकांना प्रवेश प्रक्रियेदरम्यान कोणतीही अडचण येऊ नये, तसेच त्यांना अचूक मार्गदर्शन मिळावे यासाठी आदित्य कृषी महाविद्यालयात विशेष प्रवेश कक्ष सुरू करण्यात आला आहे.प्रवेशाबाबत अधिक माहितीसाठी विद्यार्थी व पालकांनी ९४०३६०७०७३ व ९३२६७०७००५ या क्रमांकावर संपर्क साधावा

भविष्यातील रोजगार, उद्योजकता आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या दृष्टीने कृषी शिक्षण हे अत्यंत उपयुक्त क्षेत्र आहे. विद्यार्थ्यांनी पारंपरिक करिअरच्या चौकटीबाहेर विचार करून कृषी व संलग्न अभ्यासक्रमांची निवड करावी.

-प्राचार्य श्याम भुतडा, आदित्य कृषी महाविद्यालय

# पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते एकल वापर प्लास्टिक बंदी मोहिमेचे उद्घाटन

बीड । प्रतिनिधी

वाढत्या लोकसंख्येमुळे आणि बाजारपेठांच्या विस्तारामुळे प्लास्टिक कचऱ्याची मोठी समस्या निर्माण झाली आहे. यावर मात करण्यासाठी बीड जिल्ह्यातील सर्व नगरपरिषद आणि नगरपंचायत क्षेत्रांमध्ये ३० दिवसांची विशेष एकल वापर प्लास्टिक बंदी (सिंगल युज प्लास्टिक) मोहिम राबविली जात आहे. या मोहिमेचे अधिकृत उद्घाटन पर्यावरण, वातावरणीय बदल तथा पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते करण्यात आले.

एकल वापर प्लास्टीक बंदी विशेष मोहिमेचा शुभारंभ जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात करण्यात आला. या प्रसंगी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहेमान, निवासी उपजिल्हाधिकारी सतिश सोनी यांच्यासह संबंधित यंत्रणेचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.




बीड जिल्ह्यातील ६ नगरपरिषदा आणि ५ नगरपंचायती अशा एकूण ११ शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये 'सिंगल युज प्लास्टिक मुक्त शहर' ही संकल्पना राबवली जात आहे. जिल्हा प्रशासन अधिकारी जाधव यांनी दिलेल्या माहितीनुसार, या मोहिमेची अंमलबजावणी पुढील ३ टप्प्यात केली जाईल.

टप्पा १ मध्ये १५ ते २५ जुलै कालावधीत व्यापक जनजागृती मोहिम राबविण्यात येईल. टप्पा २ मध्ये २६ जुलै ते ५ ऑगस्ट कालावधीत व्यापारी प्रतिष्ठाने आणि बाजारपेठांमध्ये विशेष तपासणी व दंडात्मक कारवाई राबविण्यात येईल. तर टप्पा ३ मध्ये ६ ते १५ ऑगस्ट कालावधीत प्लास्टिकमुक्त शहर संकल्पनेतंर्गत विविध विशेष उपक्रम राबविण्यात येणार आहेत. कापडी व पर्यावरणपूरक पिशव्यांच्या वापराला प्रोत्साहन देणे. व्यापारी, शाळा, महाविद्यालये आणि स्वयंसेवी संस्थांना मोहिमेत जोडणे. प्लास्टिक संकलन करणे आणि नियम मोडणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करणे. ही मोहिमेची वैशिष्ट्ये आहेत. अशी माहिती जिल्हा प्रशासन अधिकारी संभाजी वाघमारे यांनी यावेळी दिली. सार्वजनिक आरोग्य आणि घनकचरा व्यवस्थापनासमोरील आव्हाने दूर करण्यासाठी नागरिकांनी या मोहिमेत सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

## तुकाराम मुंडेंना पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करा -डॉ.संजय तांदळे

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्यातील अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाचे आयुक्त मा. श्री. तुकाराम मुंडे (भा.प्र.से.) हे बीड जिल्ह्यातील ताडसोन्ना या ग्रामीण गावाचे सुपुत्र असून, अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून शिक्षण व कठोर परिश्रमाच्या बळावर त्यांनी भारतीय प्रशासकीय सेवेत (ख-ड) मानाचे स्थान प्राप्त केले आहे. ग्रामीण भागातील एका सर्वसामान्य कुटुंबातून देशाच्या सर्वोच्च प्रशासकीय सेवेत पोहोचत त्यांनी लाखो युवकांसमोर प्रेरणादायी आदर्श निर्माण केला आहे.

मा. श्री. तुकाराम मुंडे यांनी आपल्या संपूर्ण प्रशासकीय कारकिर्दीत प्रामाणिकपणा, पारदर्शकता, कर्तव्यनिष्ठा, शिस्त आणि लोकाभिमुख प्रशासन यांचा उत्कृष्ट समन्वय साधला आहे. विविध महत्त्वाच्या शासकीय पदांवर कार्यरत असताना त्यांनी कोणत्याही




दबावाला बळी न पडता जनहिताला सर्वोच्च प्राधान्य दिले. सार्वजनिक वितरण व्यवस्था सक्षम करणे, प्रशासनात पारदर्शकता आणणे, भ्रष्टाचाराला आळा घालणे, शासकीय यंत्रणेची कार्यक्षमता वाढविणे आणि सर्वसामान्य नागरिकांना न्याय देण्यासाठी त्यांनी केलेले कार्य उल्लेखनीय व अनुकरणीय आहे.

त्यांच्या कार्यशैलीमुळे केवळ बीड जिल्ह्याचेच नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्राचे नाव देशभरात उंचावले आहे. आज राज्यातील लाखो नागरिक त्यांच्याकडे एक प्रामाणिक, निडर, जनतेसाठी झटणारा आणि आदर्श प्रशासकीय अधिकारी म्हणून पाहतात. त्यांच्या कर्तृत्वाने ग्रामीण भागातील युवकांमध्ये मोठी प्रेरणा निर्माण झाली असून, प्रामाणिकपणे काम करणाऱ्या अधिकाऱ्यांचे ते एक प्रभावी प्रतीक बनले आहेत.

मा. श्री. तुकाराम मुंडे यांनी देशाच्या सार्वजनिक प्रशासनात दिलेले निःस्वार्थ, जनहितकारी आणि उल्लेखनीय योगदान लक्षात घेता, भारत सरकारचा प्रतिष्ठेचा पद्मश्री पुरस्कार त्यांना प्रदान करणे अत्यंत योग्य, न्याय्य आणि गौरवास्पद ठरेल, अशी बीड जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रातील नागरिकांची मनापासून भावना आहे. त्यामुळे मे. पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी साहेब आपण मा. श्री. तुकाराम मुंडे (भा.प्र.से.) यांच्या उत्कृष्ट प्रशासकीय सेवाकार्याची दखल घेऊन त्यांना पद्मश्री पुरस्कार देऊन सन्मानित करण्याचा अनुकूल निर्णय घेण्यात यावा अशी मागणी बीड जिल्हा सामाजिक कार्यकर्ता संघटनेच्या वतीने दिनांक १५ जुलै २०२६ बुधवार रोजी जिल्हाधिकारी कार्यालय मार्फत पंतप्रधान नरेंद्र मोदी व गृहमंत्री अमित शहा यांना पाठवलेल्या निवेदनाद्वारे केली आहे. यावेळी डॉ. संजय तांदळे, प्राचार्य डी.जी. तांदळे, बाजीराव ढाकणे, शेख युनूस,रामधन जमाले, बाळासाहेब मोरे पाटील, अशोक येडे, सय्यद सादेक, आर. डी. जोगदंड, हनुमान घोडके, सुदाम कोळेकर आदींची उपस्थिती होती.

## पान ६ वरुन...

### मंडळ अध्यक्ष विनायक रत्नपारखी

दिसावीत आणि अपघात टाळता यावेत, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश आहे. याच दिवशी चर्मकार समाजातील गरजू बांधवांना पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर छत्र्यांचे वाटप करण्यात येणार आहे.

दि. २५ जुलै रोजी केशवराज मंदिर येथे भाविकांसाठी फराळ वाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. दि. २६ जुलै रोजी माजलगांव येथील ❊ग्रामदैवत श्री सिद्धेश्वर मंदिरात महाआरतीचे आयोजन करण्यात आले असून, लोकनेत्या पंकजाताई मुंडे यांच्या उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य व निरोगी आयुष्यासाठी साकडे घालण्यात येणार आहे. यावेळी कार्यकर्ते व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. रुपाली कचरे यांनी सांगितले की, सेवेतून वाढदिवस - समाजहितासाठी सदैव तत्पर या संकल्पनेतून हे उपक्रम आयोजित करण्यात आले आहेत. पर्यावरण संवर्धन, सामाजिक बांधिलकी जपणे आणि गरजू घटकांना मदतीचा हात देणे हा या उपक्रमांचा मुख्य उद्देश आहे. पंकजाताई मुंडे यांच्या कार्यातून प्रेरणा घेत समाजोपयोगी उपक्रमांची परंपरा पुढे नेण्याचा भाजप कार्यकर्त्यांचा प्रयत्न असल्याचे त्यांनी नमूद केले.या चार दिवसीय सेवा उपक्रमांमध्ये भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून कार्यक्रम यशस्वी करावा, असे आवाहन किट्टी आडगाव मंडळाच्या अध्यक्षा रुपाली कचरे, पात्रुड मंडळाचे अध्यक्ष डॉ. अभिजित सोळंके आणि भाजपचे शहर मंडळ तालुका अध्यक्ष विनायक रत्नपारखी यांनी केले आहे.

### धनेगाव फाट्यावर वारकऱ्यांची

ग्रामस्थ मोठ्या उत्साहाने सेवाकार्यात सहभागी झाले आहेत. आयोजकांच्या आत्मीयतेमुळे वारकऱ्यांनीही समाधान व्यक्त करत त्यांना मनापासून आशीर्वाद दिले.भक्ती, सेवा आणि सामाजिक बांधिलकीचा संगम घडविणारा धनेगाव फाट्यावरील हा उपक्रम आषाढी वारीचे खरे वैशिष्ट्य अधोरेखित करत आहे. विठ्ठलभक्तांच्या निःस्वार्थ सेवेमुळे परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले असून, या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

### लोकशाहीच्या बळकटीसाठी

धस म्हणाले, मतदानाचा हक्क हा लोकशाहीचा सर्वात मोठा आधार आहे. हा अधिकार अबाधित राहावा यासाठी प्रत्येक नागरिकाने एसआयआर-२ अंतर्गत आपली मतदार नोंदणी व पडताळणी वेळेत पूर्ण करावी. लोकशाही बळकट करण्यासाठी प्रत्येकाचा सहभाग महत्त्वाचा आहे. यावेळी उपस्थित नागरिकांनाही त्यांनी एसआयआर-२ मोहिमेत सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन केले. आजच आपला एसआयआर-२ अर्ज भरा; अन्यथा मतदानाच्या अधिकारापासून वंचित राहण्याची शक्यता आहे, असे स्पष्ट आवाहनही त्यांनी केले.

### मंत्रिपद पद सोडू नका

अहोरात्र काम करणाऱ्या या व्यक्तीचे आरोग्य धोक्यात आले आहे. सरकारने राजकारण बाजूला ठेवून त्वरित वैद्यकीय आणि प्रशासकीय मदत द्यावी, अशा आशयाचे पत्रक काँग्रेसच्या वतीने दत्ता कांबळे यांनी दिले आहे.

सोनम वांगचूग यांची देशाला गरज

सोनम वांगचूग हे गेल्या अनेक वर्षांपासून लडाखमधील शिक्षण, पाणी आणि पर्यावरणासाठी काम करत आहेत. त्यांच्या आंदोलनामुळे संपूर्ण देशाचे लक्ष लडाखकडे वळले आहे. अशा स्थितीत त्यांना काही झाले तर ते देशासाठी मोठे नुकसान असेल. वागचूग यांची देशाला खरी गरज आहे. नीट पेपर फुटीमुळे हजारो विद्यार्थ्यांचे आयुष्य उध्वस्त करत असताना केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान राजीनामा मागणी देशात जोर धरत असताना, मंत्र्यांचा राजीनामा नाही घेतला हरकत नाही, परंतु देशभरातील विध्यार्थी, शेतकरी आणि कष्टकऱ्यांचा आवाज असणाऱ्या सोनम वांगचूग यांचे उपोषण सोडून त्यांचे प्राण वाचवून देशभावना जपावी, असे काँग्रेस अनुसूचित जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष दत्ता कांबळे यांनी म्हटले आहे.

दरम्यान, सोनम वांगचूग यांच्या जीविताची हानी झाल्यास देशातील युवकांच्या आक्रोशास केंद्र शासन जबादार असेल, हा आक्रोश इथली बदमाश व्यवस्था उलथून टाकेल, असा इशारा सामाजिक कार्यकर्ते दत्ता कांबळे यांनी सरकारला दिला आहे.

### पत्रकारावर गुन्हा

चर्चेचे सूत्रसंचालन जुहिली पांगम या करत होत्या. लोकशाहीत माध्यमांचे काम जनतेच्या शंका आणि प्रशासनाची बाजू समाजासमोर आणणे हे असते.आणि प्रशासनाची बाजू समाजासमार आणण हे असत. मात्र, या दाव्याचे खापर थेट चॅनेलच्या संपादकांवर फोडत महावितरणने त्यांच्यावर भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमांखाली गुन्हे दाखल केले. केवळ सोशल मीडियावर चर्चेचे रील प्रसारित केल्याच्या कारणावरून गुन्हेगारी पद्धतीने धमकावणे, भीती पसरवणे असे गंभीर आरोप एका पत्रकारावर लावणे, हा कायद्याचा आणि अधिकारांचा गैरवापर असल्याचे मत सर्व स्तरातून व्यक्त होत आहे.लोकशाहीचा चौथा स्तंभ असलेल्या माध्यमांवर गुन्हे दाखल करण्याच्या या दडपशाही प्रवृत्तीमुळे महावितरणच्या पारदर्शकतेवरच आता मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. डिजिटल मिडिया परिषदेचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे यांनी या घटनेचा निषेध केला आहे.

## जय जवान विद्यालयात स्वातंत्र्य सेनानी अरुणा असफ अली यांची जयंती उत्साहात साजरी

वडवणी । प्रतिनिधी

आज रोजी दिनांक १६ जुलै २०२६ वार गुरुवार रोजी अरुणा संपले महिला मंडळ बीड संचलित जय जवान माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय कवडगाव या ठिकाणी स्वातंत्र्य सेनानी अरुणा असफ अली यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. सदरील प्रसंगी सुरुवातीस स्वातंत्र्य सेनानी अरुणा असफ अली यांच्या पावन प्रतिमेचे पूजन करून व पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले.

त्यांच्या विषय सर्व विद्यार्थी विद्यार्थिनी यांना माहिती देण्यात आली.अरुणा गांगुली यांचा जन्म १६ जुलै १९०९ रोजी तत्कालीन पंजाबमधील हरियाणा राज्यातील कालका येथे एका बंगाली कुटुंबात झाला. त्यांचे कुटुंब जातीने ब्राह्मण होते. त्यांचे नाव अरुणा गांगुली होते.




त्यांचे शालेय शिक्षण नैनिताल मध्ये झाले, जिथे त्यांच्या वडिलांचे हॉटेल होते. त्या अत्यंत तल्लख बुद्धीच्या आणि एक हुशार विद्यार्थिनी होत्या. लहानपणापासूनच त्या नेहमी वर्गात प्रथम येत असत. त्यांची बुद्धिमत्ता आणि विनोदबुद्धी आधीच सिद्ध झाली होती. लाहोर आणि नैनिताल मध्ये शिक्षण पूर्ण केल्यानंतर, त्या शिक्षिका बनल्या आणि त्यांनी कोलकाता येथील गोखले मेमोरियल कॉलेजमध्ये शिकवण्यास सुरुवात केली.

१९३०, १९३२ आणि १९४१ च्या वैयक्तिक सत्याग्रह आंदोलन दरम्यान अरुणाजी नी तुरुंगवास भोगला. जयप्रकाश नारायण, डॉ. राम मनोहर लोहिया आणि अच्युत पटवर्धन यांसारख्या समाजवाद्यां च्या विचारांचा त्यांच्यावर खोलवर प्रभाव होता. या कार्यक्रमासाठी उपस्थित असलेले सर्व मान्यवर व्यक्ती, तसेच विद्यालयाचे प्राचार्य, व विद्यालयातील सर्व विद्यार्थी विद्यार्थिनी व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी वृंद उपस्थित होते.

## निरगुडी येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन; बक्षीस वितरण सोहळा होणार

बीड । प्रतिनिधी

भगवान शिक्षणप्रसारक मंडळ, बीड संचलित जवाहर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, निरगुडी (ता. पाटोदा, जि. बीड) येथे संस्थेचे संस्थापक व विद्यालयाचे पहिले मुख्याध्यापक कै. गुरुवर्य भा. वा. सानप सर यांच्या ३७ व्या पुण्यतिथीनिमित्त शनिवार, दि. १८ जुलै २०२६ रोजी सकाळी ९.३० वाजता अभिवादन, स्मृतिपूजन व विद्यार्थ्यांच्या गुणवंतांचा बक्षीस वितरण समारंभ आयोजित करण्यात आला आहे.



कै. भा. वा. सानप सर यांनी ग्रामीण भागात शिक्षणाचा दीप प्रज्वलित करून हजारो विद्यार्थ्यांना ज्ञान, संस्कार आणि समाजसेवेची प्रेरणा दिली. त्यांच्या कार्याचा आदर्श आजही विद्यार्थ्यांसह शिक्षक व शिक्षणप्रेमींसाठी प्रेरणादायी आहे. त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ दरवर्षी पुण्यतिथीनिमित्त विविध शैक्षणिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. यावर्षीच्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. श्री. प्रकाशरावजी सुस्कर (अण्णा) (उपाध्यक्ष, भगवान शिक्षणप्रसारक मंडळ, बीड) हे राहणार आहेत. प्रमुख पाहुणे म्हणून मा. श्री. प्रशांतजी शिंदे (गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती पाटोदा), मा. ड. प्रकाशदादा कवठेकर (माजी जिल्हा परिषद सदस्य, डोंगरकिनी गट) तसेच मा. श्री. संतोष अर्जुन जायभाये (केंद्रप्रमुख, केंद्र नायगांव मयुर) उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांच्या विविध स्पर्धांमधील गुणवंतांचा सत्कार, बक्षीस वितरण, स्मृतिपूजन तसेच प्रेरणादायी मार्गदर्शन होणार आहे. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संस्थेचे पदाधिकारी, संचालक मंडळ, शिक्षक व कर्मचारी परिश्रम घेत आहेत. या पुण्यतिथी कार्यक्रमास पालक, माजी विद्यार्थी, ग्रामस्थ, शिक्षणप्रेमी तसेच परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कै. गुरुवर्य भा. वा. सानप सर यांना अभिवादन करावे, असे आवाहन विद्यालयाचे प्राचार्य श्री. बी. एन. बटुळे यांनी केले आहे.

## संत मुक्ताबाई पालखीतील वारकऱ्यांसाठी ५०० मोफत प्रथमोपचार (मेडिकल) किटचे वाटप

### मंत्री जयकुमार गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली सेवाभावी उपक्रम

बीड । प्रतिनिधी

संत मुक्ताबाई पालखी सोहळ्यानिमित्त पंढरपूरकडे प्रस्थान करणाऱ्या हजारो वारकरी भाविकांच्या सेवेसाठी गुरुवार, दि. १६ जुलै २०२६ रोजी सकाळी ९.०० वाजता यसवंडी फाटा येथे सेवाभावी उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. महाराष्ट्र राज्याचे ग्रामविकास व पंचायत राज मंत्री तथा सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री मा. श्री. जयकुमार गोरे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली आणि संत मुक्ताबाई पालखी प्रमुख हरणे महाराज यांच्या शुभहस्ते वारकरी भाविकांना ५०० मोफत प्रथमोपचार (मेडिकल) किटचे वाटप करण्यात आले.

दरवर्षी लाखो वारकरी विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी पायी वारी करतात. या दीर्घ आणि कष्टमय प्रवासात वारकऱ्यांना लहान-मोठ्या आरोग्यविषयक अडचणींचा सामना




करावा लागू नये, यासाठी प्रथमोपचार साहित्य असलेले मेडिकल किट उपलब्ध करून देण्याचा हा उपक्रम राबविण्यात आला. या किटमध्ये प्रवासादरम्यान उपयोगी पडणाऱ्या आवश्यक प्रथमोपचार साहित्याचा समावेश करण्यात आला होता.

किट वाटपावेळी वारकरी भाविकांनी या सेवाभावी उपक्रमाचे मनापासून स्वागत करत आयोजकांचे आभार मानले. ''वारकऱ्यांची सेवा हीच विठ्ठलाची सेवा'' या भावनेतून राबविण्यात आलेल्या या उपक्रमामुळे पालखी सोहळ्यात भक्तिमय वातावरणासोबतच समाजसेवेचाही सुंदर संदेश देण्यात आला.

यावेळी मोठ्या संख्येने वारकरी भाविक, स्थानिक नागरिक, स्वयंसेवक आणि कार्यकर्ते उपस्थित होते. शिस्तबद्ध पद्धतीने मेडिकल किटचे वितरण करण्यात आले. अनेक वारकऱ्यांनी हा उपक्रम अत्यंत उपयुक्त असल्याची भावना व्यक्त केली.या उपक्रमाचे आयोजन श्री.जयकुमार गोरे साहेब वैद्यकीय मदत कक्ष प्रमुख.स्वपनील वरपे पाटील तसेच जीवनदायी ब्लड बँकेचे संचालक. दत्ता (भाऊ) आघाव सर यांनी केले असून, वारकऱ्यांच्या सेवेसाठी पुढील काळातही अशाच समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन श्री.जयकुमार गोरे साहेब वैद्यकीय मदत कक्षाच्या वतीने करण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

## शांतीब्रह्म ह.भ.प. तुकाराम महाराज भारती यांनी अध्यात्मिक आदर्श निर्माण केला -राजेंद्र मस्के

बीड । प्रतिनिधी

श्रीक्षेत्र बेलेश्वर देवस्थानाचे उत्तराधिकारी म्हणून ह.भ.प. तुकाराम महाराज भारती यांनी केवळ धार्मिक परंपरा जपल्या नाहीत, तर धर्म, अध्यात्म, संस्कार आणि सदाचार यांची शिकवण देत श्रीक्षेत्र बेलेश्वर परिसरातील भाविकांना सुसंस्कारित करण्याचे महान कार्य केले आहे. श्रीक्षेत्र बेलेश्वरचा विकास आणि संस्थानचे महात्म्य संवर्धित करण्याची जबाबदारीही त्यांनी समर्थपणे स्वीकारली असून, त्यादृष्टीने सातत्याने कार्य सुरू ठेवले आहे, असे गौरवोद्गार राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार बीड जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी काढले.



परिसरातील ग्रामस्थांशी त्यांचा जिव्हाळ्याचा संपर्क, सर्वांशी प्रेमाने व आत्मीयतेने संवाद साधण्याची शैली, विनम्र वाणी, स्नेहपूर्ण स्वभाव आणि सेवाभावी वृत्ती यांमुळे त्यांचे लोभस व्यक्तिमत्त्व सर्वांच्या मनात घर करून आहे. त्यांची वाढती लोकप्रियता ही त्यांच्या निःस्वार्थ धर्मसेवेची आणि सुसंस्कारित जीवनमूल्यांचीच पावती आहे.

अनेक युवकांना त्यांनी व्यसनमुक्ती, सुसंस्कार आणि अध्यात्माची प्रेरणा दिली असून, हजारो भाविकांना ईश्वरभक्तीचा मार्ग दाखवत समाजात अध्यात्मिक जागृती घडवून आणण्याचे कार्य ते अविरतपणे करत आहेत. आपल्या अभ्यासपूर्ण प्रवचनांमधून, हरिनाम सप्ताह, कीर्तन, भजन आणि विविध धार्मिक उपक्रमांद्वारे त्यांनी समाजात ईश्वरभक्ती, नैतिक मूल्ये, परस्पर प्रेम, बंधुभाव आणि सामाजिक ऐक्याचा संदेश सातत्याने दिला आहे.

# दुबार पेरणीसाठी मोफत बियाणे : महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे

मुंबई / प्रतिनिधी

बोगस बियाण्यांमुळे पीक न उगवल्यास किंवा नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान होऊन दुबार पेरणीची वेळ आल्यास शेतकऱ्यांना स्वखर्चाने बियाणे खरेदी करावे लागणार नाहीत, अशा बाधित शेतकऱ्यांना जिल्हा नियोजन अन् विकास समितीच्या निधीतून (डीपीडीसी) मोफत बी-बियाणे उपलब्ध करून दिले जाईल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हा निर्णय घेतल्याची माहिती मंत्रिमंडळ बैठकीनंतर महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.

मंत्रालयात प्रसारमाध्यमांशी बोलताना त्यांनी कृषी, शेतरस्ते, आदिवासी विकास आणि कायदा व सुव्यवस्थेबाबत सरकारच्या विविध निर्णयांची माहिती दिली. राज्यात अनेक ठिकाणी (विशेषतः अमरावती, अकोला, नागपूर व इतर भागांत) वितरकाने बोगस बियाणे दिल्यामुळे सोयाबीन किंवा कापसाचे पीक उगवले नसल्याच्या तक्रारी आल्या आहेत. पीक पेरणीनंतर ते न उगवल्यास किंवा नैसर्गिक आपत्तीमुळे उद्ध्वस्त झाल्यास शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट कोसळते. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना पुन्हा आर्थिक भुर्दंड पडू नये, म्हणून फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकारने हा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. पालकमंत्री आपल्या जिल्ह्यातील 'डीपीडीसी' निधीतून शेतकऱ्यांना बियाण्यांसाठी निधी व बियाणे उपलब्ध करून देतील, असे मंत्री बावनकुळे यांनी स्पष्ट केले. या निर्णयाबद्दल त्यांनी मुख्यमंत्र्यांचे आभार मानले. शेतकऱ्यांना शेतात जाण्यासाठी योग्य रस्ते उपलब्ध व्हावेत, यासाठी सरकारने एक विशेष 'डिजिटल प्लॅटफॉर्म आणि डॅशबोर्ड' तयार केला आहे. या माध्यमातून शेत रस्त्यांची मोजणी करणे, रस्ते खुले करणे आणि त्यांना क्रमांक देणे या प्रक्रिया गतिमान केल्या जातील. या 'प्लॅटफॉर्म'द्वारे प्रत्येक शेतकऱ्याच्या रस्त्याबाबतच्या तक्रारींवर थेट लक्ष ठेवले जाईल. ते संपूर्ण महाराष्ट्रात लवकरच कार्यान्वित केले जाईल. पालघर जिल्ह्यातील दापचरी येथे आंतरराष्ट्रीय दर्जाची कृषी उत्पन्न बाजारपेठ निर्माण करण्याचा मोठा निर्णय आजच्या बैठकीत घेण्यात आला. या बाजारपेठेमुळे राज्यातील शेतीमालाला जागतिक स्तरावर मोठी बाजारपेठ आणि वाव मिळण्यास मदत होणार आहे. आदिवासी भागातील ज्या बांधवांना अद्याप वनहक्क पट्टे मिळालेले नाहीत, त्यांच्यासाठी वनहक्क समितीची पुन्हा बैठक घेऊन पुनर्विलोकन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यानंतर पात्र आदिवासी बांधवांना वनपट्ट्यांचे तातडीने वाटप करण्याच्या सूचना मुख्यमंत्र्यांनी दिल्या आहेत.



## हळद लागवडीचे सुधारीत तंत्रज्ञान

हळदीची लागवड एप्रिल महिन्याच्या मध्यापासून ते जून महिन्यापर्यंत करावी. लागवडीपूर्वी रासायनिक व जैविक बीजप्रक्रिया अवश्य करावी. हळद लागवडीसाठी चांगले उत्पादन देणाऱ्या सुधारित ९ जातींची निवड महत्त्वाची ठरते. पाणी देण्याच्या पद्धतीनुसार हळद लागवडीच्या सरी वरंबा आणि रुंद वरंबा अशा दोन पद्धती पडतात. पूर्वमशागतीपासून ते हळद प्रक्रियेपर्यंत योग्य व्यवस्थापन करणे गरजेचे असते. तसेच लागवडीसाठी भौगोलिक स्थितीनुसार योग्य जातीची निवड महत्त्वाची ठरते. लागवडीपूर्व जमिनीची योग्यप्रकारे पूर्वमशागत करणे अत्यंत आवश्यक आहे. पिकांस उष्ण व दमट हवामान चांगले मानवते. मध्यम पाऊस व स्वच्छ सूर्यप्रकाशात पिकाची वाढ उत्तम होते. जास्त तापमान असलेल्या ठिकाणी किमान तापमानाची तीव्रता कमी झाल्यावरच लागवड करावी. मध्यम काळी, पाण्याचा चांगला निचरा होणारी जमीन लागवडीस निवडावी. नदीकाठच्या पोयट्याच्या जमिनीत हळदीचे उत्पादन भरपूर मिळते. जमिनीचा सामू ६.५ ते ७.५ च्या दरम्यान असावा. जमिनीची खोली साधारणपणे २० ते २५ सेंमी असावी.

खते : जमिनीतील ओलाव्यानुसार ठिबक संच चालू ठेवावा. सतत पाणी सोडू नये. सतत ओलावा राहिल्याने हळकुंडे कुजण्याची शक्यता असते. लागवड एप्रिल-मे महिन्यात होत असल्याने सुरवातीच्या काळात पाऊस पडेपर्यंत पाण्याची अत्यंत आवश्यकता असते. कारण मुळांना जमिनीत स्थिरता प्राप्त होण्याचा हा काळ असतो. या कालावधीत आंबवणीचे पाणी लगेच ४ ते ६ दिवसांच्या अंतराने द्यावे. जमिनीच्या प्रतीनुसार हा कालावधी कमी जास्त ठेवावा. जमिनीतील ओलाव्यानुसार ठिबक संच चालू ठेवावा. सतत पाणी सोडू नये. सतत ओलावा राहिल्याने हळकुंडे कुजण्याची शक्यता असते. लागवड एप्रिल-मे महिन्यात होत असल्याने सुरवातीच्या काळात पाऊस पडेपर्यंत पाण्याची अत्यंत आवश्यकता असते. मुळांना जमिनीत स्थिरता प्राप्त होण्याचा हा काळ असतो. या कालावधीत आंबवणीचे पाणी लगेच ४ ते ६ दिवसांच्या अंतराने द्यावे. जमिनीच्या प्रतीनुसार हा कालावधी कमी जास्त ठेवावा. सेंद्रिय खताचा जास्तीत जास्त वापर केल्यास उत्पादनवाढीस फायदा होतो. पूर्वमशागतीच्या वेळी हेक्टरी ३५ ते ४० टन चांगले कुजलेले शेणखत जमिनीत मिसळावे. माती परीक्षणानुसार हेक्टरी २०० किलो नत्र, १०० किलो स्फुरद आणि १०० किलो पालाश द्यावे.



## मासेपालन, बदकपालन व्यवसाय करेल लखपती; असे करा एकत्रित नियोजन!



महाराष्ट्रात शेतकरी शेतीसोबतच अनेक जोडधंदे करत मोठी आर्थिक कमाई करत असतात. यात प्रामुख्याने दुग्ध व्यवसाय दुसऱ्या स्थानी असून, अनेक भागांमध्ये मोठ्या शेततळ्यांमध्ये शेतकऱ्यांकडून मासेपालन केले जाते. विशेष म्हणजे राज्य सरकारकडून देखील शेतकऱ्यांना वेळोवेळी मासेपालनासाठी अनुदान उपलब्ध करून दिले जाते. ज्यामुळे सध्या अनेक शेतकरी मासेपालन व्यवसायाकडे वळत आहे. याच पार्श्वभूमीवर मासेपालन आणि बदकपालन एकत्रिपणे कसे करायचे? याबाबतचे तंत्र जाणून घेतल्यास याचा चांगला फायदा होऊ शकतो.

दोन्ही व्यवसाय एकत्रित का? : मासेपालन आणि बदकपालन एकत्रिपणे का करायचे? तर मासे ज्याप्रमाणे पाण्यात राहतात. अगदी त्याच पद्धतीने बदकाला देखील पाण्यात राहण्यास आवडते.

ज्यामुळे एकाच तळ्याच्या माध्यमातून शेतकऱ्यांना मासेपालन आणि बदकपालन करणे शक्य होणार आहे. ज्यामुळे तुमचा दोन्ही व्यवसाय करताना उत्पादन खर्च कमी राहून त्यातून तुम्हाला दुप्पट नफा मिळण्यास मदत होणार आहे. विशेष म्हणजे बदकपालन केल्याने शेततळ्याची शेवाळ किंवा अन्य बाबतीत देखील साफसफाई होते. ज्यामुळे माशांना देखील स्वच्छ ऑक्सिजन मिळण्यास मदत होते. त्यातून त्यांची पटकन वाढ होण्यास मदत होते. त्यामुळे शेतकरी मासेपालन आणि बदकपालन एकत्रितपणे करून मोठी कमाई करू शकतात.

उत्पादन खर्चात होईल बचत : कृषी व्यवसाय क्षेत्रातील जाणकारांच्या मते, मासेपालन आणि बदकपालन एकत्रितपणे केल्यास, माशांच्या खाद्यासाठी ७५ टक्के खर्च कमी होतो. याशिवाय बदक पालनादरम्यान बदकांच्या आहारावर होणारा खर्च देखील जवळपास ३० ते ३५ टक्के इतका कमी होतो.

याशिवाय शेततळे एकच असल्याने तो खर्च देखील कमी होतो. ज्यामुळे शेतकऱ्यांना या दोन्ही व्यवसायांची सांगड घालून दुप्पट नफा कमावता येऊ शकतो.

असे करा बदकपालन : साधारणपणे एक बदक जन्मल्यानंतर २४ आठवड्यानंतर अंडी देण्यास सुरुवात करते. त्यानंतर जवळपास २ वर्ष ही प्रक्रिया सुरु राहते. त्यामुळे तुम्ही एका तळ्यात जवळपास २५० ते ३०० बदक सहजपणे पाळू शकतात. तळ्यामध्ये मासेपालन करताना शेतकऱ्यांनी माशांच्या छोटे बीज न टाकता, त्याऐवजी आकाराने मोठे असलेले ४ ते ५ हजार फिंगरलिंग टाकले पाहिजे. त्यानंतर माशांना पाण्यामध्ये खाण्यासाठी धानाचे भूस, ढेप, मिनरल मिक्चर टाकले पाहिजे. ज्यामुळे ६ ते ९ महिन्याच्या कालावधीमध्ये एक मासा एक किलोपर्यंत वाढण्यास मदत होते.

किती मिळते उत्पन्न? :

एक एकराच्या तळ्यात मासेपालन आणि बदकपालन एकत्रिपणे करत असाल तर त्यातून १८ ते २० क्विंटलहुन अधिक माशांचे उत्पादन मिळू शकते. तर बदक पालन करताना बदकांना खाद्य म्हणून बरसीमचे गवत, ओट्स, पालेभाज्या, भाताचे भुस, खनिज मिश्रण आणि बाजारात तयार खाद्य देऊ शकता.

साधारणपणे चार ते साडेचार महिन्यात बदक अंडी देण्यास सुरुवात करते. ज्यामुळे एकत्रिपणे मासेपालन आणि बदकपालन करून ५ ते ६ लाखांची कमाई सहज करू शकतात.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१४८९ : निजाम खान यांची सिकंदर शाह द्वितीय यांच्या नावाने दिल्लीचे सुल्तान म्हणून घोषित करण्यात आलं.
१८०२ : मोडी लिपीतून पहिल्यांदाच मुद्रण करण्यात आले.
१८१९ : 'अ‍ॅडॅम्स-ओनिस' करारानुसार फ्लोरिडा हे राज्य अमेरिकेने स्पेनकडुन ५ दशलक्ष डॉलर देऊन विकत घेतले.
१८४१ : अतिशय गाजलेल्या 'पंच' या विनोदी साप्ताहिकाचा पहिला अंक प्रकाशित झाला.
१९१७ : किंग जॉर्ज (पाचवा) यांनी फतवा काढून जाहीर केले की त्यांच्या वंशातील पुरुष मंडळी 'विंडसर' हे आडनाव लावतील.
१९४७ : मुंबई ते रेवस अशी जलवाहतुक करणार्या 'रामदास' या फेरीबोटीला गटारी अमावस्येच्या रात्री 'काशाचा खडक' या ठिकाणाजवळ जलसमाधी मिळुन सुमारे ७०० लोक मृत्यूमुखी पडले.
१९५० : देशांतील पहिली विमान दुर्घटना पंजाब राज्यातील पठाणकोट येथे घडून आली.
१९५३ : अमेरिकन व्यंग चित्रकार व लेखक वॉल्ट डिझ्नी यांनी अमेरिकेतील ॲनाहेम, कॅलिफोर्निया या दोन ठिकाणी 'डिस्नेलँड' सुरू केले.
१९५५ : वॉल्ट डिस्ने यांनी ॲनाहेम, कॅलिफोर्निया येथे 'डिस्नेलँड' सुरू केले.
१९७५ : अमेरिकेचे अपोलो रशियाचे सोयुझ ही दोन अंतराळयाने एकमेकांस जोडली गेली.
१९७६ : कॅनडातील मॉन्ट्रिअल येथे २१ व्या ऑलिम्पिक स्पर्धांना सुरुवात झाली.
१९९३ : तेलगू भाषेतील प्रतिष्ठेचा मानला जाणारा 'तेलगू थल्ली' हा सर्वोच्च पुरस्कार ज्येष्ठ विचारवंत तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांना प्रदान
१९९४ : विश्वकप फूटबॉलच्या अंतिम सामन्यात ब्राझिलने इटालीला पेनल्टी शूटआऊटमधे हरवले.
२००० : अभिनेत्री व नृत्यांगना वैजयंतीमाला बाली यांना'भरतनाट्य शिखरमणी' पुरस्कार जाहीर
२००४ : तामिळनाडुतील कुंभकोणम गावात एका शाळेला लागलेल्या आगीत ९० विद्यार्थी मृत्यूमुखी पडले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८८९ : अर्ल स्टॅनले गार्डनर अमेरिकन लेखक आणि वकील (मृत्यू: ११ मार्च १९७०)
१९१७ : भारतीय अभिनेते, गायक आणि पटकथालेखक बिजोन भट्टाचार्य यांचा जन्म. (मृत्यू: १९ जानेवारी १९७८)
१९१८ : ग्वाटेमालाचा राष्ट्राध्यक्ष कार्लोसमनुएल अराना ओसोरिया यांचा जन्म.
१९१९ : स्नेहल भाटकर संगीतकार (मृत्यू: २९ मे २००७)
१९२३ : कूपर कार कंपनी चे सहसंस्थापक जॉन कूपर यांचा जन्म. (मृत्यू: २४ डिसेंबर २०००)
१९३०: बाबुराव बागूल दलित साहित्यिक (मृत्यू: २६ मार्च २००८)
१९५४ : अँजेला मेर्केल जर्मनीच्या चॅन्सेलर
१९५९ : भारतीय हिंदी आणि मल्याळम चित्रपट अभिनेत्री जरीना वहाब यांचा जन्मदिन.
१९६९ : भारतीय हिंदी आणि भोजपुरी चित्रपट अभिनेता रवी किशन यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१७९० : ॲडॅम स्मिथ स्कॉटिश अर्थशास्त्रज्ञ आणि तत्त्ववेत्ता (जन्म: ५ जून १७२३)
१८३५ : मेघालय सम्राट तिरोट सिंग यांचे निधन.
१९२८ : भारताच्या ज्येष्ठ समाजवादी नेत्या आणि भारतीय संसदेच्या सदस्या मृणाल गोरे यांचे निधन.
१९७२ : गुजरात राज्यातील प्रसिद्ध राजकारणी आणि 'अखिल भारतीय किसान सभे'चे नेते, इंदुलाल याज्ञिक यांचे निधन.
१९९२ : काननदेवी बंगाली व हिंदी चित्रपटातील अभिनेत्री व गायिका १९३० ते १९५० (जन्म: २२ एप्रिल १९१६)
१९९२ : शांता हुबळीकर प्रभातच्या 'माणूस' चित्रपटामुळे गाजलेल्या अभिनेत्री, पुणे महापालिकेतर्फे 'बालगंधर्व पुरस्कार' (जन्म: १४ एप्रिल १९१४)
२००५ : युनायटेड किंग्डमचे पंतप्रधान सर एडवर्ड हीथ यांचे निधन.
२०१२ : मृणाल गोरे समाजवादी नेत्या आणि ६ व्या लोकसभेच्या सदस्य (जन्म: २४ जून १९२८)
२०१२ : भारतीय-इंग्रजी राजकारणी मार्शा सिंह यांचे निधन. (जन्म: ११ ऑक्टोबर १९५४)
२०२० : सी.एस. शेषाद्री भारतीय गणितज्ञ व चेन्नई मॅथेमॅटिकल इन्स्टिट्यूटचे संस्थापक पद्म भूषण, शांती स्वरूप भटनागर पुरस्कार (जन्म: २९ फेब्रुवारी १९३२)

## खरिपात मका लागवड अधिक फायदेशीर



देशात रब्बी पिकांचा हंगाम संपला आहे. शेतकऱ्यांनी आता खरीप हंगामाची तयारी सुरू केली आहे. खरीप हंगामात अनेक पिके घेतली जात असली तरी. परंतु, देशाच्या बहुतांश भागात भात किंवा मक्याची लागवड केली जाते. मात्र, शेतकरी अनेकदा संभ्रमात पडतात की मका पिकवायचा की भात? जर आपण भाताबद्दल बोललो तर ते खरीप हंगामातील मुख्य पीक आहे. देशात धानाची लागवड मोठ्या प्रमाणावर केली जाते. मात्र धानापेक्षा मका शेती ही शेतकऱ्यांना जास्त फायदेशीर आहे. धानाच्या तुलनेत मका लागवडीत शेतकऱ्यांना दुप्पट नफा मिळू शकतो.

देशात वर्षभर मक्याची लागवड केली जाते. पाणी उपलब्ध असताना विविध भागातील शेतकरी वर्षभर शेती करतात. परंतु हे प्रामुख्याने खरीप पीक मानले जाते. खरीप हंगामात याची लागवड मोठ्या प्रमाणात केली जाते. विशेषतः ज्या राज्यांमध्ये शेतकरी पावसावर आधारित सिंचनावर अवलंबून आहेत. त्या राज्यांमध्ये शेतकरी पावसाळ्यात वरच्या जमिनीवर मका पिकवतात आणि त्याच्या लागवडीतून चांगले उत्पादन मिळते. मक्याचा भावही चांगला असेल तर त्याची विक्री करून शेतकऱ्यांना चांगला नफा मिळतो. विशेषत: मक्यावर प्रक्रिया केल्यानंतर त्यापासून अनेक उत्पादने तयार केली जातात. त्यामुळे त्याला बाजारपेठेत मोठी मागणी आहे. खरिपातच जास्त मका का घेतला जातो. त्यामागील कारण काय आणि त्यातून शेतकऱ्यांना काय फायदा होतो? हे जाणून घेणे अत्यंत आवश्यक आहे. खरेतर खरीप हंगामात मका लागवड केल्याने हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर पीक चक्र सुधारण्यास मदत होते आणि शेतकऱ्यांना अधिक नफाही मिळतो. कमी पावसातही तयार होणारे आणि चांगले उत्पादन देणारे हे पीक आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना याचा लाभ मिळतो. भातशेतीत उत्पादन थोडे कमी झाले तर भार पडतो. भातशेतीपेक्षा मक्याच्या शेतीतून जास्त उत्पन्न मिळते.

मका शेतीत नफा : मक्याची लागवड करून शेतकरी हेक्टरी ६८ हजार रुपयांपर्यंत निव्वळ उत्पन्न मिळवू शकतात. तर भातशेती करून शेतकऱ्यांना केवळ ३५ हजार रुपये प्रति हेक्टर निव्वळ नफा मिळू शकतो. त्यामुळे या बातमीत आम्ही तुम्हाला खरीप हंगामात मका पिकवणे अधिक फायदेशीर का आहे हे सांगणार आहोत. अधिकाधिक शेतकरी शेती करून चांगला नफा मिळवू शकतात आणि त्यांचे उत्पन्न वाढवू शकतात.

खरिपातील मका लागवडीचे फायदे : मका पिकाला खूप कमी पाणी लागते. एकीकडे मका पिकवण्यासाठी ६२७-६२८ मिमी/हेक्टर पाणी लागते, तर भात पिकवण्यासाठी सरासरी १०००-१२०० मिमी/हेक्टर पाण्याची गरज असते. मक्याचे वाढीचे चक्र भातापेक्षा कमी असते. यामुळे शेतकऱ्यांना त्यांची पिके लवकर कापणी आणि विकण्याची सोय होते. खरीप मक्याचे सरासरी उत्पादन ५०-५५ क्विंटल/हेक्टर आहे. तर भाताचे सरासरी उत्पादन ३५-४० क्विंटल/हेक्टर आहे. भातापेक्षा मक्यावर किडीचा प्रादुर्भाव कमी असतो आणि कीड व्यवस्थापनाचा खर्चही कमी असतो. खरीप मका सामान्यतः रब्बी मक्यापूर्वी काढला जातो आणि पुरवठा तुलनेने कमी असताना बाजारात उपलब्ध होतो. त्यामुळे शेतकऱ्यांना चांगला भाव मिळतो. खरीप मका हे गहू किंवा कडधान्ये यांसारख्या इतर पिकांसोबत आवर्तनाने पीक घेता येते, जमिनीची सुपीकता सुधारते आणि कीड आणि रोगांचा संचय कमी होतो. खरीप मका पीक विविधीकरणाची संधी देते, ज्यामुळे एकच पीक (उदा. भात) वाढण्याशी संबंधित जोखीम कमी होते.





राज्य लोकतंत्र

# मराठवाडा वृत्तांत



# संत वामनभाऊंच्या पालखीचे जामखेडमध्ये पहिले गोल रिंगण उत्साहात

जामखेड। प्रतिनिधी

जामखेड शहरालगत असलेल्या जमादारवाडी येथील संत वामनभाऊ गडावर गुरुवारी (ता. १६) दुपारी ३ वाजता संत वामनभाऊ महाराज यांच्या पालखीचे पहिले गोल रिंगण भक्तिमय वातावरणात उत्साहात पार पडले. टाळ-मृदंगाच्या गजरात आणि विठ्ठलनामाच्या जयघोषात वारकरी व भाविक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. श्रीक्षेत्र गहिनीनाथ गड येथून गडाचे मठाधिपती महंत विठ्ठल महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली पालखी पंढरपूरकडे मार्गस्थ झाली असून गहिनीनाथ गड, निवडुंगा, वाहली, सावरगाव, केकानवस्ती, वनवेवाडी, मातकुळी मार्गे जामखेड तालुक्यात दाखल झाली.

जामखेड शहरात श्री नागेश्वर भजनी मंडळाने भजन करीत पालखीचे स्वागत केले. यावेळी विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनीही पालखीचे स्वागत करून वारकऱ्यांसमवेत सहभाग घेतला. शहरातील विविध ठिकाणी महिलांनी सडा-रांगोळी काढून स्वागत केले, तर नागरिकांनी वारकऱ्यांसाठी पाणी, नाश्ता व इतर सुविधांची



व्यवस्था केली. जमादारवाडी येथील संत वामनभाऊ मंदिरात नगराध्यक्षा प्रांजल चिंतामणी व अमित चिंतामणी यांच्या हस्ते महंत विठ्ठल महाराज यांचा सत्कार करण्यात आला. त्यानंतर गोल रिंगण सोहळा पार पडला. ''पुंडलिक वरदे हरी विठ्ठल''च्या गजरात वारकऱ्यांनी पालखीभोवती प्रदक्षिणा घालत भक्तिमय वातावरण निर्माण केले. महंत विठ्ठल महाराज यांच्या अभंग गायनानंतर वारकऱ्यांनी पारंपरिक खेळ व फुगड्यांचा आनंद लुटला. रिंगणानंतर भोजनाचा कार्यक्रम पार पडला असून पालखीचा पुढील मुक्काम सारोळा येथे झाला.




# बाबुजी आव्हाड महाविद्यालयात कागदी पिशवी प्रशिक्षण संपन्न

पाथर्डी । प्रतिनिधी

बाबूजी आव्हाड महाविद्यालयात पर्यावरण संवर्धनासाठी राष्ट्रीय छात्र सेना विभागाच्या छात्रांना कागदी पिशवी बनवणे प्रशिक्षण देण्यात आले राष्ट्रीय छात्र सेना छात्रा बरोबरच महाविद्यालयातील इतर विद्यार्थीही या उपक्रमामध्ये सहभागी झाले होते अलीकडील काळात मोठ्या प्रमाणामध्ये प्लास्टिकचा वापर वाढलेला आहे त्यामुळे मानव पशुपक्षी वन्यजीव जलसृष्टीला मोठ्या प्रमाणावर हानी पोहोचत आहे.

प्लास्टिकचा वापर टाळून कागद व कापड याचा वापर मोठ्या प्रमाणामध्ये वाढला तर पर्यावरण संवर्धन होऊन स्वच्छ भारताची निर्मिती होईल या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते प्रशिक्षण घेतलेले एनसीसीचे छात्र आणि महाविद्यालयातील विद्यार्थी हे यापुढे अशीच प्लॅस्टिक मुक्त व्यवस्था निर्माण करण्यासाठी तसेच कागदी व कापडी पिशव्यांचा वापर वाढण्यासाठी समाज जागृती करतील असा विश्वास यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बबन चौरे यांनी व्यक्त केला या कार्यक्रमाच्या शेवटी सर्वांनी मिळून कागदी पिशव्यांचा वापर आणि प्लास्टिकला नकार असा सामूहिक निर्धार केला या कार्यक्रमासाठी संस्थेचे विश्वस्त कुणाल आव्हाड डॉ.किरण गुलदगड प्रा.ब्रह्मानंद दराडे डॉ.अर्जुन केरकळ प्रा.मन्सूर शेख प्रा.अभिजीत बोरुले प्रा.आशा पालवे प्रा.अश्विनी एडके उपस्थित होते या कार्यक्रमाचे संयोजन एनसीसी विभाग प्रमुख कॅप्टन डॉ.अजयकुमार पालवे यांनी केले.

# सीईओ महाडदळकरांनी विद्यार्थ्यांची घेतली 'गुणवत्तेची परीक्षा'

## कसबे तडवळे जिल्हा परिषद शाळेला भेट; अध्यापन, सुविधा आणि शैक्षणिक उपक्रमांचा घेतला आढावा

धाराशिव । प्रतिनिधी

धाराशिव जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियवंदा महाडदळकर यांनी मंगळवारी (दि. १४) सकाळी कसबे तडवळे येथील जिल्हा परिषद आदर्श केंद्रीय प्राथमिक शाळेला भेट देऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधला. तसेच शाळेतील शैक्षणिक उपक्रम, विद्यार्थ्यांची गुणवत्ता आणि उपलब्ध सुविधांचा आढावा घेतला. महाडदळकर यांनी सकाळी साडेआठ वाजता शाळेला भेट देत इयत्ता पहिली ते सहावीच्या वर्गांना भेट दिली. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधत त्यांच्या शैक्षणिक प्रगतीची माहिती घेतली. इयत्ता तिसरीच्या विद्यार्थ्यांकडून पाठ्यपुस्तकाचे वाचन करून घेतले, तर पाचवीच्या विद्यार्थ्यांशी इंग्रजी विषयावर चर्चा केली. विद्यार्थ्यांना ''मोठे झाल्यावर काय होणार?'' असा प्रश्न विचारून त्यांच्या भविष्यातील ध्येयांविषयी त्यांनी माहिती घेतली. विद्यार्थ्यांच्या उत्तरांवर समाधान व्यक्त करत त्यांना सातत्याने अभ्यास करण्याचा सल्ला दिला. गणित विषयाच्या नवोदय स्पर्धा परीक्षेच्या सराव वह्यांचीही त्यांनी पाहणी केली.

शाळा व शाळा व्यवस्थापन समितीच्या वतीने मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियवंदा महाडदळकर यांचा 'मिरॅकल' हे पुस्तक भेट देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी पाचवीतील शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांना 'मन में है विश्वास' हे पुस्तक भेट देण्यात आले. तसेच डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धेत यश मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. यानंतर महाडदळकर यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर



स्मारकास भेट देऊन माहिती घेतली. शाळेच्या भौतिक सुविधांचा आढावा घेताना दोन नादुरुस्त वर्गखोल्यांच्या निर्लेखनाबाबत शाळा व्यवस्थापन समिती व मुख्याध्यापकांकडून माहिती घेऊन आवश्यक सूचना दिल्या. यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष विजय पवार, मुख्याध्यापक केशव पवार, सदस्य राहुल नाईकनवरे, भागवत शिंदे, तेजस भालेराव, पवन करंजकर, नानासाहेब पवार, भारत लोंढे, माजी अध्यक्ष अमोल पवार, सोमनाथ भोसले, राजेंद्र करंजकर, प्रशांत सदावर्ते, बाळासाहेब करंजकर तसेच शिक्षणप्रेमी नागरिक उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचे सीईओंकडून कोड कौतुक मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियवंदा महाडदळकर यांनी शाळेतील विविध शैक्षणिक उपक्रमांची पाहणी केली. विद्यार्थ्यांच्या वाचन, इंग्रजी संभाषण आणि स्पर्धा परीक्षा तयारीचे त्यांनी कौतुक केले. विद्यार्थ्यांनी मोठी स्वप्ने पाहून त्यासाठी मेहनत घ्यावी, असे आवाहन त्यांनी केले. शाळेतील शिक्षकांनी राबविलेल्या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत सकारात्मक बदल दिसून येत असल्याचे त्यांनी नमूद केले. शाळेच्या भौतिक सुविधांबाबतही त्यांनी माहिती घेऊन आवश्यक उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या.

# कळंब उपजिल्हा रुग्णालयाच्या जागेचा प्रश्न लवकर मार्गी लावू

## संयुक्त बैठक घेण्याचे पालकमंत्र्यांचे आश्वासन

कळंब। प्रतिनिधी

शहरातील उपजिल्हा रुग्णालयाला १०० खाटांची मंजुरी मिळाल्यानंतर विस्तारासाठी आवश्यक जागेचा प्रश्न तातडीने सोडवण्याची मागणी जोर धरत आहे. या पार्श्वभूमीवर शिवसेनेचे माजी जिल्हाप्रमुख अजित पिंगळे यांनी पालकमंत्री प्रताप सरनाईक यांची मुंबई येथे भेट घेऊन रुग्णालय विस्ताराचा विषय मांडला. या वेळी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांची संयुक्त बैठक लवकरच घेऊन हा प्रश्न निकाली काढण्याचे आश्वासन पालकमंत्र्यांनी दिले.

कळंब शहरात १९९२ च्या सुमारास ग्रामीण रुग्णालयाच्या धर्तीवर उभारण्यात आलेल्या इमारतीतच आजही उपजिल्हा रुग्णालयाचा कारभार सुरू आहे. शहराचा विस्तार आणि ग्रामीण भागातील वाढती लोकसंख्या लक्षात घेऊन २ जानेवारी २०१७ रोजी या रुग्णालयाला उपजिल्हा रुग्णालयाचा दर्जा देत ५० खाटांची मान्यता दिली. त्यानंतर २८ फेब्रुवारी २०२५ रोजी रुग्णालयाची क्षमता वाढवून १०० खाटांना मंजुरी दिली. मात्र, खाटांची संख्या वाढली असली तरी त्यानुसार आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध झालेल्या नाहीत. आजही जुन्याच इमारतीत रुग्णालय सुरू असल्याने रुग्णांवर उपचार करताना जागेची कमतरता, विविध विभागांसाठी अपुरी व्यवस्था आणि रुग्ण तसेच नातेवाइकांची गैरसोय अशा अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. दरम्यान, नव्या इमारतीसाठी शहरापासून सुमारे सहा किलोमीटर अंतरावरील जागा आरक्षित करण्याचा प्रस्ताव पुढे आला होता. मात्र रुग्णालय शहराबाहेर गेल्यास सर्वसामान्य रुग्णांची गैरसोय होईल. या कारणामुळे या प्रस्तावाला तीव्र विरोध केला. पिंगळे यांनी पालकमंत्री सरनाईक यांची मुंबईत भेट घेतली तेव्हा पालकमंत्र्यांनी जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा शल्यचिकित्सक, मुख्याधिकारी व संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांसोबत बैठकीचे आयोजन करून प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लावण्याचे आश्वासन दिले आहे. आरक्षित ६० आर जागा केव्हा मिळणार आहे ? कळंब शहराच्या सन २०२२ च्या सुधारित शहर विकास आराखड्यात महत्त्वाचा बदल करण्यात आला आहे. यामध्ये पूर्वीचे जलतरण तलाव आणि क्रीडांगणाचे आरक्षण रद्द करून त्याच ठिकाणी उपजिल्हा रुग्णालयाच्या विस्तारासाठी ६० आर जागा आरक्षित करण्यात आली आहे. सदरील जागा उपजिल्हा रुग्णालयास हस्तांतरित कधी होणार असा प्रश्न उपस्थित होत आहे.

# भास्करराव अंबेकर यांचे श्रीविठ्ठल-रुक्मिणी दर्शन

जालना। प्रतिनिधी

जालना शहराचे माजी नगराध्यक्ष भास्करराव अंबेकर यांनी आषाढीच्या पावन वातावरणात पत्नी सौ.शोभाताई व कन्या नेहा हिच्यासह पंढरपूर येथे श्रीविठ्ठल-रुक्मिणीचे दर्शन घेऊन विधिवत पूजा केली. यावेळी त्यांनी राज्यातील शेतकरी, सर्वसामान्य नागरिक आणि मुक्या जनावरांच्या कल्याणासाठी श्रीविठ्ठल-रुक्मिणी चरणी प्रार्थना केली. मागील पंधरा दिवसांपासून अनेक भागांत समाधानकारक पाऊस न झाल्याने बळीराजा चिंतेत असून शेतकरी



आभाळाकडे आशेने डोळे लावून बसला आहे. वेळेत पाऊस न पडल्यास शेतकऱ्यांसह मुक्या जनावरांवरही मोठे संकट ओढवू शकते, करिता ''राज्यात भरपूर व समाधानकारक पाऊस पडू दे, शेतकऱ्यांची पिके बहरून येऊ दे आणि सर्व जनता सुखी, समृद्ध व निरोगी राहू दे,'' अशी श्री विठ्ठल चरणी मनोभावे प्रार्थना केली.

# १० दिवसांनंतर पैठणसह, ढोरकीन, बिडकीन, शिऊर, लासूरला पाऊस

पैठण। प्रतिनिधी

दहा दिवसांच्या विश्रांतीनंतर पैठणसह तालुक्यातील ढोरकीन, बिडकीन, बालानगर, ढाकेफळ, चितेगाव परिसरात पावसाने दमदार हजेरी लावली. चितेगाव आणि बिडकीनला दोन तास झालेल्या मुसळधार पावसामुळे रस्त्यावर पाणी साचले होते, तर गंगापूर तालुक्यातील लासूर स्टेशन, सावंगी, शिल्लेगाव, देवळी, रांजणगाव पोळ, सुलतानाबाद, वैजापूर तालुक्यातील शिऊर परिसरातही पावसाने हजेरी लावली आहे. या पावसामुळे पिकांना संजीवनी मिळणार असून, दुबार पेरणीचे संकट टळले आहे.

बुधवारी सायंकाळी ५.३० वाजेच्या सुमारास पैठण तालुक्यात पावसाने पुनरागमन केले. बिडकीन व चितेगाव परिसरात मुसळधार पाऊस झाला, तर पैठण शहरासह तालुक्यात इतरत्र मध्यम स्वरूपाच्या सरी कोसळल्या. या पावसामुळे करपण्याच्या मार्गावर असलेल्या खरीप पिकांना मोठा दिलासा मिळाला असून, बळीराजा सुखावला आहे. मात्र, बुधवारी बिडकीनचा आठवडी बाजार असल्याने अचानक आलेल्या या पावसामुळे किरकोळ व्यापाऱ्यांची मोठी धांदल उडाली. पंधरा दिवसांपासून दडी धरून बसलेला पाऊस बुधवारी शिऊर व परिसरात जोमाने बरसला. सुरुवातीचा अल्प पाऊस त्यातच जेमतेम ओलीवर शेतकऱ्यांनी बियाणे मातीत टाकले होते. मात्र अचानक पाऊस गायब झाल्याने शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण पसरले होते. या पावसामुळे पिकांना संजीवनी मिळणार आहे.


**जाहीर प्रगटन**

**मा. श्री एम. ए. शिंदे, दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, पाटोदा, ता. पाटोदा, जि. बीड यांच्या न्यायालयात.**

**किरकोळ दिवाणी अर्ज २१९/२०२६**

**कांताबाई व इतर विरुध्द निरंक**

**मार्फत :- ॲड. व्ही. एन. मस्के**

अर्जदार : १. कांताबाई भ्र. रामदास पोले, वय ७७ वर्षे, धंदा शेती, २. पंजाब पि. रामदास पोले, वय ४२ वर्षे, धंदा शेती,

३. बाळू पि. रामदास पोले, वय ४१ वर्षे, धंदा शेती, ४. हरिदास पि. रामदास पोले, वय ३८ वर्षे, धंदा शेती, अर्जदार क. १ ते ४ रा. भुरेवाडी ता. पाटोदा जि. बीड,

विरूध्द निरंक

मागणी अर्ज:- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत. वरील अर्जदार क. १ ते ४ यांनी या न्यायालयात मयत रामदास पि. लक्ष्मण पोले यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे. ज्याअर्थी रामदास पि. लक्ष्मण पोले यांचा मृत्यु दिनांक १७/१२/२०२४ रोजी भुरेवाडी ता. पाटोदा जि. बीड येथे झाला असुन अर्जदार क. १ ही मयताची पत्नी असून अर्जदार क. २ ते ४ हे मयताचे मुले आहेत.

वरील अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामाकरीता व इतर कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत अथवा त्यांच्या व्यतिरीक्त इतर कोणी मयताचे वारस आहेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर या जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरह मयत रामदास पि. लक्ष्मण पोले यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. आज दिनांक ०८ जुलै २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. १२ ऑगस्ट २०२६.

स्वाक्षरित/-
**क. लिपीक**

आदेशावरुन
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क. स्तर,
पाटोदा. ता. पाटोदा, जि. बीड.


# मिनार परिसरात बिबट्या बछड्यासाठी दोन पिंजरे

## देवगिरी किल्ला परिसरात २ पथकांकडून शोध



दौलताबाद। प्रतिनिधी

ऐतिहासिक देवगिरी किल्ला परिसरात बिबट्याचा वावर असल्याने पर्यटक, पुरातत्त्व विभागाचे कर्मचारी आणि स्थानिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. अखेर वन विभागाने लावलेल्या पिंजऱ्यात रविवारी (१२ जुलै) मध्यरात्रीनंतर वाजण्याच्या सुमारास बिबट्याचा एक बछडा जेरबंद झाला. त्यानंतर आता दुसरा बछडा व बिबट्या यांना पकडण्यासाठी २ स्वतंत्र पिंजरे लावण्यात आले आहेत.

गेल्या सुमारे ६ महिन्यांपासून किल्ला परिसरात ३ ते ४ बिबट्यांचा वावर आहे. त्यामध्ये २ बछडे आहेत. त्यांना पकडण्यासाठी ११ जुलै रोजी वन विभागाने पिंजरा लावला. त्यात बिबट्याचा बछडा अडकल्यानंतर त्याची मादी पिंजऱ्याजवळच बराच वेळ घुटमळत होती. पिल्लापासून दूर झाल्याने ती अस्वस्थ झाली होती आणि वारंवार डरकाळ्या फोडत होती. सोमवारी सकाळपासून किल्ला परिसरात व्यापक सर्च ऑपरेशन हाती घेण्यात आले आहे. ४ दिवसांपासून वन विभागाच्या २ रेस्क्यू टीम तैनात आहेत. पिंजऱ्यात शिकारीसाठी बकरी व कोंबड्या ठेवण्यात आल्या आहेत. किल्ला परिसरात ड्रोनद्वारे सर्च ऑपरेशन अद्याप सुरू आहे. हे ऑपरेशन उपवनसहायक सुवर्णा माने, सहायक वन विभाग अधिकारी आशा चव्हाण, निखिल देशमुख यांच्या देखरेखीखाली सुरू आहे.

# बाबुजी आव्हाड महाविद्यालयात झाली करिअर संसदेची स्थापना

## ओमकार शिरसाट मुख्यमंत्री दिपा काकडे हिची नियोजन मंत्री नियुक्त!

पाथर्डी । प्रतिनिधी

येथील बाबूजी आव्हाड महाविद्यालयात सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी करिअर कट्टा अंतर्गत करिअर संसदेची स्थापना करण्यात आली. जागतिक युवा कौशल्य दिनाचे औचित्य साधून महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्रशिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने स्थापन करण्यात आलेल्या करिअर कट्टा अंतर्गत करिअर १० करियर संसद पदाधिकाऱ्यांची नियुक्ती यावेळी करण्यात आली यामध्ये ओमकार शिरसाट या विद्यार्थ्याची पुन्हा मुख्यमंत्री म्हणून निवड करण्यात आली दिपा काकडे नियोजन मंत्री विद्या पुंड कायदे व शिस्तपालन मंत्री संचिता वायकर सामान्य प्रशासन मंत्री ऋतुंभरा उबाळे माहिती व प्रसारण मंत्री मयुरी जाधव उद्योजकता विकास मंत्री अनुष्का ढोले रोजगार व स्वयंरोजगार मंत्री गौरव जाधव कौशल्य विकास मंत्री ज्ञानेश्वरी पुंड संसदीय कामकाज मंत्री अनम शेख महिला व बालकल्याण मंत्री म्हणून नियुक्ती करण्यात आली सर्व नूतन करियर संसद पदाधिकारी यांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बबन चौरे यांनी पद व चांगल्या कार्याची शपथ दिली यावेळी बोलताना प्राचार्य डॉ बबन चौरे म्हणाले करिअर कट्टा अंतर्गत महाविद्यालयीन करिअर




संसदेची स्थापना व त्याअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांचे हे दुसरे वर्ष असून जानेवारी महिन्यात झालेल्या करिअर संसदेच्या बारामती येथे झालेल्या राज्यस्तरीय अधिवेशनात महाविद्यालयाच्या करिअर संसद पदाधिकारी यांनी उल्लेखनीय कार्य केले करिअरकट्टा हा महाराष्ट्र सरकारच्या उच्च आणि तंत्रशिक्षण विभागाचा आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्राच्या समन्वयाने सुरू केलेला एक स्तुत्य उपक्रम आहे या व्यासपीठाचा उद्देश विद्यार्थ्यांना करिअर विकासासाठी मार्गदर्शन आणि कौशल्य प्रशिक्षण प्रदान करणे हा आहे करिअरकट्टा विविध करिअर मार्ग कौशल्य विकास संधी आणि नोकरीच्या संधी उपलब्ध करून शैक्षणिक आणि उद्योग यांच्यातील दरी भरून काढण्यावर लक्ष केंद्रित करत आहे आजच्या स्पर्धेच्या व जागतिकीकरणाच्या युगामध्ये जो विद्यार्थी स्वत:मध्ये सकारात्मक बदल घडवून आलेल्या संधीचा आपल्या करियरसाठी उपयोग करेल तोच यशस्वी होईल त्यासाठी करिअर कट्टा सारख्या उपक्रमातून गरजू गरीब व होतकरू विद्यार्थी अतिरिक्त कौशल्य प्राप्त करेल यावेळी करिअर कट्टा समन्वयक डॉ.किरण गुलदगड व डॉ.अभिमन्यू ढोरमारे डॉ.वैशाली आहेर पर्यवेक्षक प्रा.सलीम शेख डॉ.ब्रम्हानंद दराडे उपस्थित होते.

# चिंचोटी तलाठी कार्यालय की कुलूपबंद केंद्र? अधिकारी गैरहजर

**नागरिकांचा संताप, महसूल प्रशासनावर गंभीर प्रश्न,वेळेत कार्यालय न उघडणे, वारंवार गैरहजेरीचे आरोप; शेतकऱ्यांना हेलपाटे, चौकशी व कारवाईची मागणी**

वडवणी । प्रतिनिधी

शासनाने लाखो रुपयांचा खर्च करून उभारलेले चिंचोटी येथील तलाठी कार्यालय नागरिकांच्या सेवेसाठी आहे की कायम कुलूपबंद ठेवण्यासाठी, असा संतप्त सवाल शेतकरी आणि ग्रामस्थ उपस्थित करत आहेत. कार्यालयीन वेळेत संबंधित तलाठी वारंवार अनुपस्थित राहत असल्याचा आरोप होत असून, महसूल विभागाच्या कारभाराबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

सातबारा उतारा, फेरफार, वारस नोंद, उत्पन्नाचा दाखला, रहिवासी दाखला तसेच इतर महसूल विभागाशी संबंधित कामांसाठी दररोज अनेक शेतकरी आणि नागरिक चिंचोटी तलाठी कार्यालयात येतात. मात्र, संबंधित अधिकारी वेळेत उपलब्ध नसल्याने




नागरिकांना तासन्तास प्रतीक्षा करून अखेरीस रिकाम्या हाताने परतावे लागत असल्याची तक्रार आहे. परिणामी शेतकऱ्यांचा वेळ, पैसा आणि श्रम वाया जात असून, प्रशासनावरील विश्वासही कमी होत असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. शासनाने नागरिकांना जलद व पारदर्शक सेवा मिळावी म्हणून आधुनिक सुविधा असलेली कार्यालये उभारली आहेत. मात्र, अधिकारीच वेळेचे पालन करत नसतील तर या सुविधांचा नेमका उपयोग काय, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. महसूल विभागातील अशा निष्काळजीपणामुळे सर्वसामान्य नागरिकांना विनाकारण मानसिक आणि आर्थिक त्रास सहन करावा लागत असल्याची भावना व्यक्त होत आहे. ग्रामस्थांनी संबंधित तलाठी यांच्या उपस्थितीची नोंद, कार्यालयीन कामकाज आणि नागरिकांकडून करण्यात आलेल्या तक्रारींची सखोल चौकशी करून दोषी आढळल्यास कठोर प्रशासकीय कारवाई करावी, अशी मागणी केली आहे.

महसूल विभागाची कार्यालये ही सर्वसामान्यांच्या दैनंदिन गरजांशी निगडित आहेत. अशा ठिकाणी अधिकारी वेळेत उपलब्ध नसतील, तर नागरिकांनी न्याय मागायचा कुणाकडे? केवळ चौकशीची आश्वासने देण्यापेक्षा प्रत्यक्ष उपस्थिती, कामकाजाची शिस्त आणि जबाबदारी निश्चित करण्यासाठी महसूल प्रशासनाने तातडीने प्रभावी पावले उचलावीत, अशी मागणी आता जोर धरत आहे.

### महिना-महिना सज्जावर येत नाहीत' – ग्रामस्थांचा आरोप

ग्रामस्थ अर्जुन गोंडे यांनी आरोप केला की, आमच्या सज्जच्या तलाठी मॅडम महिना-महिना सज्जवर येत नाहीत. फोन केल्यावर 'मी सुट्टीवर आहे', 'चार्ज दुसऱ्याकडे आहे', 'मी गावी आहे', 'ऑफिसच्या कामासाठी बाहेर आहे' अशी उडवाउडवीची उत्तरे दिली जातात. त्यामुळे त्यांच्या कामकाजाची सखोल चौकशी होणे अत्यंत गरजेचे आहे.

### आठवड्यातून तीन दिवस सज्जसाठी निश्चित –तहसीलदार

याबाबत वडवणीचे तहसीलदार वैभव महींद्रकर यांनी सांगितले, संबंधित तलाठी यांचे आठवड्यातून तीन दिवस सज्जसाठी नियोजन आहे. कार्यालयीन इतर कामांमुळे काहीवेळा येणे झाले नसेल. मात्र, या प्रकरणी मी त्यांच्याशी चर्चा करतो.

### 'लेखी तक्रार करा, चौकशी होईल' – मंडळ अधिकारी

मंडळ अधिकारी फुलचंद खाडे यांनी सांगितले की, तलाठी कार्यालयाची अधिकृत वेळ सकाळी ९.४५ ते सायंकाळी ६.१५ आहे. नागरिकांनी लेखी तक्रार केल्यास तहसीलदारांच्या आदेशानुसार चौकशी करून नियमानुसार अहवाल सादर करण्यात येईल.

## युसूफवडगांवात वरुणराजाची दमदार हजेरी पिकांना नवसंजीवनी, दुबार पेरणीचे संकट टळले

युसूफवडगांव । प्रतिनिधी

गेल्या अनेक दिवसांपासून पावसाने दडी मारल्याने केज तालुक्यातील युसूफवडगांव व परिसरातील शेतकरी चिंतेत होता.पावसाअभावी खरीप हंगामातील सोयाबीन, कापूस, मका आदी पिके करपू लागली होती. मात्र बुधवारी दुपारनंतर वरुणराजाने दमदार हजेरी लावत परिसराला अक्षरशः झोडपुन काढले.या मुसळधार पावसामुळे शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर पुन्हा एकदा समाधानाचे हास्य फुलले असून, करपू लागलेल्या पिकांना नवसंजीवनी मिळाली आहे.

यंदा मान्सूनच्या लहरीपणामुळे पेरणीनंतर पुरेसा पाऊस न झाल्याने



शेतकऱ्यांची चिंता दिवसेंदिवस वाढत होती. अनेक ठिकाणी जमिनीतील ओलावा संपल्याने पिकांची वाढ खुंटली होती. पाऊस आणखी काही दिवस लांबला असता,अनेक शेतकऱ्यांवर दुबार पेरणीची वेळ आली असती. मात्र, काल झालेल्या दमदार पावसाने हे संकट सध्या तरी दूर केले आहे.

सततच्या प्रतीक्षेनंतर झालेल्या या पावसामुळे शेतात पुन्हा ओलावा निर्माण झाला असून,पिकांना नवजीवन मिळाले आहे.ओढे-नाले वाहू लागले असून, विहिरी व शेततळ्यांच्या पाणीपातळीतही वाढ होण्यास मदत झाली आहे. या पावसामुळे खरीप हंगामाला नव्याने बळ मिळणार आहे.अचानक बरसलेल्या वरुणराजामुळे संपूर्ण परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. हा पाऊस दोन-तीन दिवस उशिरा झाला असता तर मोठे नुकसान झाले असते, अशी भावना अनेक शेतकऱ्यांनी व्यक्त केली. पुढील काही दिवसांतही अशीच पावसाची साथ मिळाल्यास यंदाचा खरीप हंगाम चांगला होईल, अशी आशा शेतकरी व्यक्त करत आहेत.

## अनिलदादा जगताप यांची गोंडे परिवाराला सांत्वनपर भेट; शिवसेनेकडून आर्थिक मदतीचा हात!

वडवणी । प्रतिनिधी

तालुक्यातील चिंचोटी येथील कै. माऊली दिलीप गोंडे यांचे विजेच्या तारेचा धक्का लागून अपघाती निधन झाल्याची अत्यंत दुःखद घटना घडली. या घटनेनंतर शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी गोंडे परिवाराची प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले. यावेळी त्यांनी दुःखी कुटुंबीयांना धीर देत, या कठीण प्रसंगी शिवसेना आणि जगताप कुटुंब त्यांच्या पाठीशी ठामपणे उभी



असल्याचा विश्वास दिला. तसेच शिवसेनेच्या वतीने आर्थिक मदत करत मदतीचा हात देण्यात आला.

यावेळी शिवसेना वडवणी तालुकाप्रमुख माऊली गोंडे, युवासेना जिल्हाप्रमुख रवीराज बडे, माजी नगरपरिषद सभापती सुनील अनभुले, सुदर्शन धांडे, शिवसेना जिल्हा संघटक योगेश नवले, शिवसेना उपजिल्हाप्रमुख संदीप माने, शिवसेना माजलगाव विधानसभा प्रमुख रामदास ढगे, ओमराजे जाधव तसेच शिवसेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी उपस्थितांनी दिवंगत कै. माऊली दिलीप गोंडे यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. ईश्वर दिवंगत आत्म्यास चिरशांती लाभो आणि गोंडे परिवाराला हे दुःख सहन करण्याची शक्ती देवो, अशी प्रार्थना करण्यात आली.

## पालखीतील चोरीचा गुन्हा २४ तासात उघड, गुन्हे शाखेकडून आरोपी गजाआड

पाटोदा । प्रतिनिधी

तालुक्यातील चुंभळी फाटा येथे १३ जुलै रोजी संत एकनाथ महाराजांच्या पालखीचे दर्शन घेत असताना गर्दीचा फायदा घेत नानासाहेब मोतीराम डिडूळ पत्रकार यांच्या खिशातून चोरी झालेल्या ११ हजार रुपयांच्या गुन्ह्याचा पाटोदा पोलिसांनी २४ तासात छडा लावला आहे. बीड गुन्हे शाखेच्या मदतीने आरोपीला अटक करण्यात आली असून मुद्देमाल शंभर टक्के रिकव्हर करण्यात आला आहे.

**रोहित गायकवाडला अटक, ११ हजारांची शंभर टक्के रिकव्हरी**

पो.स्टे. पाटोदा येथे गु.र.नं. ०२१३/२०२६ कलम ३०३ (२) इछड नुसार दाखल गुन्ह्यातील अज्ञात आरोपीचा शोध घेतला असता आरोपी रोहित अंकुश गायकवाड, रा. सुभाष कॉलनी, पेठ बीड याला ताब्यात घेण्यात आले. त्याच्याकडून चोरीचे ११ हजार रुपये रोख जप्त करण्यात आले. आरोपीला पुढील तपासासाठी पाटोदा पोलीस स्टेशनला हजर करण्यात आले आहे. गुन्हेगाराने चोरी करण्याचे फोटो स्वतः नानासाहेब डिडूळ (फिर्यादी) यांनी दिल्यामुळे गुन्हे शाखेला व पाटोदा पोलीस स्टेशन यांना गुन्हेगार सापडण्यास खूप मदत झाली. ही कारवाई पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड (स्थानिक गुन्हे शाखा बीड )यांच्या आदेशाने जारवाल, अशोक दुबाले ,बाळू सानप, सोमनाथ गायकवाड ,अर्जुन यादव, स्वाती मुंडे , सिद्धेश्वर मांजरे यांनी कारवाई केली.

## पत्रकारावर गुन्हा दाखल, घटनेचा निषेध

वडवणी । प्रतिनिधी

स्मार्ट मीटरच्या मुद्द्यावरून ग्राहकांच्या मनात असलेल्या शंकांचे निरसन करण्याऐवजी, या विषयावर चर्चा घडवून आणणाऱ्या माध्यमांचाच आवाज दडपण्याचा धक्कादायक प्रकार महावितरणच्या कृतीतून समोर आला आहे. 'कोकणसाद' युट्युब न्यूज चॅनेलचे संपादक सागर चव्हाण आणि ग्राहक प्रतिनिधी नंदन वेंगुर्लेकर यांच्यावर सावंतवाडी पोलीस ठाण्यात थेट फौजदारी गुन्हे दाखल करून महावितरणने माध्यमांची मुस्कटदाबी केली आहे..

कोकणसाद युट्युब चॅनेलवर नुकतेच स्मार्ट मीटर संदर्भात एका चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. यात महावितरणचे अधिकारी आणि ग्राहक प्रतिनिधी दोघांनाही आपली बाजू मांडण्याची समान संधी देण्यात आली होती. या चर्चेदरम्यान ग्राहक प्रतिनिधीने स्मार्ट मीटरमध्ये 'कॅमेरा' असल्याचा दावा केला. ◀◀ पान ३ वर

## भीषण अपघात व्यायामासाठी निघालेल्या दोन शाळकरी मुलांना पिकअपची जोरदार धडक

पाटोदा । प्रतिनिधी

अहमदपूर-अहिल्यानगर राष्ट्रीय महामार्गावरील मांजरसुंभा-पाटोदा मार्गावर मुळकवाडीजवळ गुरुवारी (दि. १६) पहाटे साडेपाचच्या सुमारास जनावरे वाहून नेणाऱ्या पिकअपचा भीषण अपघात झाला. रस्त्याच्या कडेला व्यायाम करत असलेल्या दोन शाळकरी मुलांना पिकअपची जोरदार धडक बसल्याने दोघेही गंभीर जखमी झाले आहेत.



मिळालेल्या माहितीनुसार, गुरुवारी पहाटे नेहमीप्रमाणे दोन शाळकरी मुले व्यायाम करण्यासाठी रस्त्याच्या कडेला आली होती. याच वेळी जनावरे घेऊन जाणारा एक पिकअप भरधाव वेगाने आला आणि चालकाचे नियंत्रण सुटल्याने त्याने या मुलांना जोरदार धडक दिली. या धडकेनंतर पिकअप रस्त्याच्या कडेला असलेल्या झाडाझुडपांत जाऊन उलटला (अपघातातील फोटोमध्ये दिसल्याप्रमाणे).

**जखमींची प्रकृती गंभीर**

या अपघातात ईश्वर गणेश ढगारे (वय १६) आणि राज बिरूदेव ढगारे (वय १६) हे दोन शाळकरी मुलगे गंभीर जखमी झाले आहेत. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली आणि दोन्ही जखमींना तातडीने उपचारासाठी बीड जिल्हा रुग्णालयात हलवले. सध्या त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात असून, महामार्गावरील अपघातांचे सत्र थांबणार कधी, असा सवाल उपस्थित केला जात आहे.

## धनेगाव फाट्यावर वारकऱ्यांची नि:स्वार्थ सेवा सलग तिसऱ्या वर्षी मोफत चहा-नाश्त्याचा उपक्रम

युसूफवडगांव । प्रतिनिधी

आषाढी एकादशीच्या पावन पर्वानिमित्त विठ्ठलाच्या दर्शनासाठी ज्ञानोबा-तुकारामचा गजर करत पंढरपूरकडे पायी निघालेल्या हजारो वारकऱ्यांसाठी केज तालुक्यातील धनेगाव फाटा येथे मोफत चहा-नाश्त्याची व्यवस्था करण्यात आली आहे. युसूफवडगांव, आनंदगाव आणि सादोळा येथील विठ्ठलभक्तांच्या संयुक्त विद्यमाने सलग तिसऱ्या वर्षी हा सेवाभावी उपक्रम राबविण्यात येत असून, यंदाही गेल्या आठ दिवसांपासून अविरत सेवा सुरू आहे.



'जनसेवा हीच ईश्वरसेवा'चा संदेश जपत युसूफवडगांव, आनंदगाव व सादोळा येथील विठ्ठलभक्तांचा स्तुत्य पुढाकार

विदर्भ व मराठवाड्यातील विविध भागांतून पंढरपूरकडे जाणाऱ्या दिंड्यांमधील हजारो वारकरी धनेगाव फाट्यावरून मार्गक्रमण करतात. दिवसभराच्या पायी प्रवासामुळे थकलेल्या वारकऱ्यांना काही क्षणांचा विसावा मिळावा, त्यांचा थकवा दूर व्हावा आणि भक्तिभावाने त्यांची सेवा करता यावी या उद्देशाने स्वयंसेवक सकाळपासून रात्रीपर्यंत चहा, नाश्ता व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करत आहेत. प्रत्येक वारकऱ्याचे हसतमुखाने स्वागत करून त्यांना आदराने अल्पोपहार दिला जात आहे.

'जनसेवा हीच ईश्वरसेवा' या विचारातून प्रेरणा घेत कोणत्याही प्रसिद्धीची अपेक्षा न ठेवता हा उपक्रम राबविण्यात येत आहे. वारकऱ्यांची सेवा म्हणजेच विठ्ठलाची सेवा, या भावनेतून युवकांसह ◀◀ पान ३ वर

## लोकशाहीच्या बळकटीसाठी प्रत्येक नागरिकाने एसआयआर-२ प्रक्रिया पूर्ण करावी; मतदानापासून वंचित राहू नका - आ. सुरेश धस

जामगाव । प्रतिनिधी

लोकशाही अधिक सक्षम आणि पारदर्शक करण्यासाठी प्रत्येक पात्र मतदाराने एसआयआर-२ (Special Intensive Revision) अंतर्गत मतदार पडताळणी प्रक्रिया पूर्ण करणे अत्यंत आवश्यक असल्याचे आवाहन आमदार सुरेश धस यांनी केले. जामगाव येथे त्यांनी स्वतःचा एसआयआर-२ अर्ज भरून नागरिकांसमोर आदर्श निर्माण केला.



मतदार यादीतील माहिती अचूक व अद्ययावत राहणे ही प्रत्येक जबाबदार नागरिकाची जबाबदारी आहे. त्यामुळे प्रत्येक मतदाराने वेळेत अर्ज भरून आपले नाव व माहिती पडताळून घ्यावी. अन्यथा भविष्यात मतदानाच्या अधिकारापासून वंचित राहण्याची वेळ येऊ शकते, असा इशाराही आ. धस यांनी दिला.

यावेळी बीएलओ शरद झेंडे आणि बीएलओ श्री. तोतरे यांनी आवश्यक मार्गदर्शन करून आ. धस यांचा अर्ज भरून घेतला. आ. सुरेश ◀◀ पान ३ वर

## मंडळ अध्यक्ष विनायक रत्नपारखी रुपाली कचरे, डॉ. अभिजित सोळंके यांच्या पुढाकारातून पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त माजलगांवात विविध सेवा उपक्रमांचे आयोजन

माजलगांव । प्रतिनिधी

भारतीय जनता पक्षाच्या ज्येष्ठ नेत्या तथा लोकनेत्या मा. ना. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता पार्टी, माजलगांवच्या वतीने दि. २३ ते २६ जुलै दरम्यान विविध सामाजिक, धार्मिक व सेवाभावी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. समाजोपयोगी कार्यातून वाढदिवस साजरा करण्याचा संदेश देणारे हे उपक्रम राबविण्यात येणार असल्याची माहिती किट्टी आडगाव मंडळाच्या अध्यक्षा रुपाली कचरे यांनी दिली.



रुपाली कचरे यांनी सांगितले की, पंकजाताई मुंडे यांनी समाजसेवा, जनकल्याण आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी सातत्याने कार्य केले आहे. त्यांच्या वाढदिवसानिमित्त केवळ शुभेच्छा देण्यापेक्षा समाजहिताचे उपक्रम राबवून त्यांच्या कार्याला अभिवादन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

या सेवा उपक्रमांची सुरुवात दि. २२ जुलै रोजी रक्तदान शिबिर २३ जुलै रोजी सकाळी १० वाजता उपजिल्हा रुग्णालय परिसरात वृक्षारोपणाने होणार आहे. माजलगव शहर मंडळ अध्यक्ष विनायक रत्नपारखी यांनी सांगितले की जागतिक पर्यावरणाच्या दिवशी पंकजाताई मुंडे यांनी केलेल्या आवाहनानुसार पर्यावरणाचा समतोल राहावा , जेणेकरून पाऊस वेळेवर पडेल व त्यासाठी पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड करण्यात येणार असल्याचे सांगितले.

दि. २४ जुलै रोजी सकाळी १० वाजता शहरातील मोकाट जनावरांच्या सुरक्षिततेसाठी त्यांच्या गळ्यात रेडियम कॉलर लावण्याचा उपक्रम राबविण्यात येणार आहे. रात्रीच्या वेळी वाहनचालकांना जनावरे सहज ◀◀ पान ३ वर

## मंत्रिपद पद सोडू नका, मात्र सोनम वांगचूग यांचे उपोषण सोडवा : दत्ता कांबळे

माजलगाव । प्रतिनिधी

'नीट' परीक्षा पेपर फुटी संदर्भात आमरण उपोषण करणारे रेमन मॅगसेसे पुरस्कार प्राप्त ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचूग यांचे प्राण वाचविण्याची गरज आहे. केन्द्रीय मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी मंत्रिपद सोडू नये, मात्र वांगचूग यांचे उपोषण सोडवावे, असे आवाहन काँग्रेस नेते दत्ता कांबळे यांनी केले आहे.





प्रसिद्ध हवामानशास्त्रज्ञ आणि लेह लडाखच्या विकासासाठी लढणारे ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचूग यांच्या तब्येतीबद्दल चिंता व्यक्त केली जात आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय काँग्रेस अनुसूचित जाती विभागाचे बीड जिल्हाध्यक्ष दत्ता कांबळे यांनी केंद्र सरकारला तातडीने हस्तक्षेप करण्याची मागणी केली आहे. केंद्र सरकार: राजीनामा नाही घेतला हरकत नाही, पण सोनम वांगचूगचे प्राण वाचवा. देशासाठी ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26